


"माझा घोडा हरवलाय्, तो शोधतोय्."
"तो काय कुंपणापलीकडे चरतोय्. तो बघ."

15 एप्रिल ६० पैसे १९७३

# अनुक्रमणिका—एप्रिल १९७३


| | |
|---|---|
| १. श्री साई वाक्सुधा | |
| २. संपादकीय – ५२ व्या वर्षात पदार्पण. | |
| ३. बाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या एका भक्ताची मुलाखत. | |
| ४. श्री साईकीर्तनमाला पुष्प ६ वें | ह. भ. प. (प्रा.) द. दि. परचुरे. |
| ५. नाथांचे भावार्थ रामायण | डॉ. माधवराव दाभाडे. |
| ६. सीतेचा निरोप | वि. के छवे. |
| ७. रामायणातील सुभाषितें | डॉ. ना. अ. देशपांडे. |
| ८. गोंदवलेकर महाराज (व्यक्तिदर्शन) ले. ४ | पु. मु. अत्रे. |
| ९. अनंतता. | श्री. चिपळूणकर गुरुजी |
| १०. ज्योतिषशास्त्र ले. १० | शरद द. उपाध्ये. |
| ११. "२४ मार्च १९७२" | श्रीराम वि. सातर्डेकर |
| १२. कविता : दाम नको मज प्रेम हवे | डी. बी. पोतनीस |
| रामगीतांजलि पुष्प १ | दिवाकर अ. घैसास |
| निरोप कसा सांगू वहिनी | दिवाकर अ. घैसास |
| वाटचाल पुढती | "हमाल" |
| १३. शिरडी वृत्त - फेब्रुआरी १९७३. | |
| १४. देणग्या – जानेवारी व फेब्रुआरी १९७३. | |



# श्री साई वाक्सुधा

**जगा लावावें सत्पथीं । हेंचि साईलीलेची कृती ॥**

कीड मुंगी सूकर श्वान । पशु पक्षी मनुष्य जाण ।
राजा रंक थोर सान । समसमान पाही जो ॥२२॥
दिसाया जरी शिरडीनिवासी । साडेतीन हाताची मिराशी ।
तरी ते सर्वहृदयवासी । पुण्यराशी महाराज ॥२३॥
अंतरीं निःसंग उदास । बाहेर लोकसंग्रहाचा सोस ।
अंतरीं जरी परम निराश । बाहेर पाश भक्तांचा ॥२४॥
अंतरीं अत्यंत निष्काम । बाह्यतः भक्तार्थ अति सकाम ।
अंतरीं निजशांतीचें धाम । बाह्य प्रकाम संतप्त ॥२५॥
अंतरीं परब्रह्मस्थिति । बाहेर दावी पैशाच वृत्ति ।
अंतरीं अद्वैतप्रीति । बाह्यतः गुंती विश्वाची ॥२६॥

—साईसच्चरित, अध्याय १०.

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] एप्रिल १९७३ [ अंक १

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

: कार्यकारी संपादक :

(प्रा.) द. दि. **परचुरे**, एम्. ए., प्रवीण.

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )

: कार्यालय :

**साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.**

**टे. नं. ४४३३६१**

# संपादकीय

## ५२ व्या वर्षांत पदार्पण

या महिन्यापासून श्रीसाईलीला मासिक ५१ वें वर्ष संपवून ५२ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. श्रीसाईलीलाचा वर्षारंभ अंक हा बहुतेक रामनवमी विशेषांक असतो. तसाच हा अंक आहे. बुधकौशिक ऋषींनी म्हटल्याप्रमाणें **'चरितं रघुनाथस्य शतकोटि प्रविस्तरम्'.** अनेक दृष्टींनी त्याकडे पाहून नाना प्रकारचा बोध माणसाला घेतां येतो. मनुष्य किती उच्च आदर्शापर्यंत पोचूं शकतो हें रामचरित्र दाखवितें. या अंकांतील कांहीं खास लेखांची निवड याच दृष्टीनें करण्यांत आली आहे.

मागल्या वर्षाच्या सुरुवातीस आम्ही कांहीं संकल्प केले होते. साईलीला मासिकांतील लेखांत विविधता व त्याचबरोबर मनोरंजकता आणणें आणि साईबाबांची वाणी या मासिकाद्वारें अधिकाधिक लोकांपर्यंत नेऊन पोचविणें हीं आमचीं प्रमुख उद्दिष्टें होतीं. मागच्या वर्षांत किती विविध विषयांवरचे व अधिकारी व्यक्तींचे लेख येऊन गेले याचें धावतें दिग्दर्शन आम्ही मार्च अंकांत केलेंच आहे. याच दिशेनें हें मासिक सर्वांगसुंदर करण्याचें काम बाबा आमचेकडून करून घेवोत.

कांहीं मासिकें केवळ विद्वानांसाठीं असतात, तर कांहीं नाटक, सिनेमा, क्रीडा, आशय नसलेल्या कथा व कविता, शब्दकोडीं इत्यादि शेंकडों मार्गांनी वाचकांची सवंग करमणूक करून आपला खप वाढविण्याची धडपड करीत असतात. याचें कारण, तीं मासिकें व्यवसाय म्हणूनच चालविलीं जातात. परंतु साईलीला मासिकाचें एक विशिष्ट असें स्थान व धोरण आहे. मुद्दाम उकरून काढलेले निरनिराळे वाद, राजकारणांतील उखाळ्या-पाखाळ्या व चिखलफेंक, नुसतीच आंकडेवारीची जंत्री असलेले लेख इत्यादींना साईलीला मासिकांत स्थान नाहीं. साईबाबांचें चरित्र व त्यांचा संदेश पसरवीत असतां इतर संतांशीं तुलना करणें व त्यांच्याबद्दल निंदा वा टीका करणें यांपासून साईलीला मासिक अलिप्त असतें. परंतु ही भूमिका लक्षांत न घेतां कांहीं निरर्थक तक्रारी करणारीं पत्रें मधून मधून येत असतात याचसाठीं हा खुलासा करावा लागत आहे.

साईलीला मासिक धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक विषयांना वाहिलेलें आहे, व अशा विषयांची आवड असणारीं लाखों माणसें महाराष्ट्रांत व अन्यत्र आहेत असें आम्हास निश्चितपणें दिसून आलें आहे. परंतु एक तर हे विषय अति क्लिष्ट व गूढ भाषेंत मांडलेले असतात, व त्यामुळें वाचक कंटाळून जातात. यासाठीं साईलीला मासिकांतील प्रत्येक लेख लोकसुलभ भाषेंत लिहिलेला असावा याबद्दल दक्षता घेण्यांत येते. आमचे विद्वान् लेखक व कवि सुद्धां अगदीं साध्या भाषेंत वाचकांशीं बोलत

असतात असें आपल्याला दिसून येईल. गंभीर समजल्या जाणाऱ्या विषयांवरचे लेखही किती सोप्या भाषेंत लिहितां येतात हें साईलीला मासिकावरून समजेल.

दुसरें असें कीं, या प्रकारच्या मासिकांचा खप मर्यादित असल्यामुळें त्याचा खर्च त्या प्रमाणांत वाढतो. परंतु शिरडी संस्थान या मासिकाचा आर्थिक भार वहात असल्यामुळें हें मासिक यापुढें अत्यल्प किंमतीस ( दर अंकास ६० पैसे; वार्षिक वर्गणी रु. ६.००) मिळणार आहे.

मराठी व इंग्रजी या भाषाभगिनी आतांपर्यंत एकाच घरांत नांदत होत्या. परंतु आतां प्रत्येकीचा व्याप वाढल्यामुळें त्यांनी या अंकापासून आपले स्वतंत्र संसार थाटले आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. दोन्ही भाषेंतील वाचकांची यामुळें मोठीच सोय होणार आहे.

## कांहीं नवीन सदरें

बाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या एका भक्ताची मुलाखत याच अंकांत देण्यांत आली आहे. ऐकलेल्या किंवा वाचलेल्या माहितीपेक्षां अशी 'चक्षुर्वै सत्यं' माहिती अधिक प्रत्ययकारी असते. अशीं वयोवृद्ध माणसें आतां दुर्मिळ होत आहेत. तरी वाचकांना आमची आग्रहाची विनंति आहे कीं त्यांनी अशा भक्तांना मुद्दाम भेटून त्यांच्या मुलाखती घ्याव्यात व प्रसिध्दीसाठीं धाडाव्यात.

न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांच्या 'अनंतते' वरील अभंगांचें विवेचन श्री. चिपळूणकर गुरुजी यांनी सुरू केलें आहे. ह्या सुटसुटीत व विचारप्रवर्तक विवेचनाचें सहर्ष स्वागत होईल अशी खात्री आहे.

आमच्या वाचकांस ज्यांत भाग घेतां येईल अशीं आणखीही सदरें सुरू करण्याचा आमचा विचार आहे.

**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ। ——भ. गी. ३–११.**

ही भावना यांत आहे. तरी विचारवंतांनी आपलें विचारधन इतरांस खुलें करावें असें आम्ही साईबाबांतर्फे आवाहन करतों.

# बाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या

# एका भक्ताची मुलाखत

आमच्या सौभाग्यवती एकदां एका मैत्रिणीकडे भेटायला गेल्या होत्या. बोलतां बोलतां साईबाबांच्या गोष्टी निघाल्या. त्या ऐकून, बाहेरच्या खोलींत बसलेले त्या मैत्रिणीचे वृद्ध सासरे एकदम म्हणाले, "अहो, मी बाबांना कित्येकदां प्रत्यक्ष भेटून त्यांचेजवळ बोललों आहें. बाबांनी समाधि घेतली तेव्हां मी ४० वर्षांचा होतों. त्यानंतर आतां ५५ वर्षें झालीं. म्हणजे मी आज ९५ वर्षांचा आहें. पण बाबांच्या गोष्टी अगदीं काल पाहिल्यासारख्या मी तुम्हाला सांगेन."

हे गृहस्थ आपलें नांव प्रकाशित करूं इच्छित नाहींत. म्हणून आपण त्यांना यापुढे 'दादा' म्हणूं.

सौ. म्हणाली, "तर मग आमचे 'हे' ( सौ. जुन्या वळणाच्या आहेत ) तुम्हाला येऊन भेटतील. त्यांना तुम्ही आपले अनुभव सांगा."

"छे, छे, त्यांना माझ्याकडे येण्याची तसदी देण्यापेक्षां मीच तुमच्याकडे येईन."

"पण आमच्या ६० पायऱ्या आहेत. म्हणजे तुम्हाला आमचेकडे येण्याची जास्तच तसदी होणार."

"नाहीं. देवानं माझे हात-पाय, नाक, कान, डोळे अजून शाबूत ठेवले आहेत. पचनशक्ति व झोंपही उत्तम आहे. तर मी जरूर तुमचेकडे येईन."

"तर मग येत्या रविवारीं सकाळीं १० वाजतां या. पण यायचं तें नुसतं नाहीं हं. तुमच्या रूपानं साईबाबांनी आमचेकडे भोजन घेतलं पाहिजे."

"काय हें नसतं मोठेपण मला चिकटवतां? पण तुम्ही बाबांच्या नांवानं बोलावल्यामुळे मला येणं भाग आहे."

ठरल्याप्रमाणें दादा आले. आलेपाकबरोबर चहापान झाल्यावर मी म्हटलें "हं, आतां सांगा. आठवेल तें सगळं अगदीं पहिल्यापासून सांगा."

"तुम्हाला काय काय सांगूं? बाबांबद्दल किती सांगितलं तरी थोडंच आहे," दादांनी सुरुवात केली. "त्यावेळीं मी प्रथमच शिरडीस गेलों होतों. संध्याकाळची वेळ होती, नि आम्ही बरेच जण मशिदींत बसलेले होतों. उष्मा खूप असल्यामुळे तिथे ठेवलेल्या मडक्यांतलें पाणी आम्ही पीत होतों. बाबा पणत्यांसाठीं तेल आणायला वाण्याकडे गेले होते. ते रोज असें तेल आणीत व आल्यावर पणत्या पेटवीत. पण त्या दिवशीं बाबा टमरेल हलवीत आले, व गाण्याच्या सुरांत तोंडानें म्हणत होते—

**तेल नहीं तो क्या करना। अरे भाई, मशीदमाईसे पूछना ॥**

पणत्या लावण्याच्या क्रमांत आज खंड पडणार असेंच सर्वांना वाटत होतें. पण बाबांनी टमरेलानें त्या मडक्यांतलें थोडें पाणी काढलें व पिऊन टाकलें ( अर्थात् अंतरात्म्याला संतुष्ट केलें ). नंतर त्याच मडक्यांतलें पाणी काढून पणत्यांत घातलें व काकडे करून ते पेटवले. तों काय चमत्कार ! आमच्या देखत पणत्या पेटल्या ! बाबांची फजिती बघण्यास आलेले लोक अवाक् झाले व आम्हीही आश्चर्यानें स्तिमित झालो. विश्वरूप दाखविणाऱ्या भगवंताप्रमाणें बाबा आम्हांस भासूं लागले, व

**गन्धर्वयक्षासुरसिद्धसंघाः वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे । भ. गी. ११–२२**

अशी सगळ्यांची अवस्था झाली, आणि

**नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ।। भ. गी. ११।३९**

असे सगळ्यांचे हात मूक आश्चर्यानें जोडले गेले. अजूनही

**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।**
**विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ।। ( १८–७७ )**

अशी माझी पुलकित अवस्था होते."

खरोखरच दादांच्या अंगावर अष्टसात्त्विकभाव उमटले होते !

"दादा, ही गोष्ट मी वीस-पंचवीस ठिकाणी वाचली आहे. पण आपल्या 'चक्षुर्वै सत्यं' निवेदनानें त्या गोष्टीचा एक अद्भुत प्रत्यय आला. बरं, त्यानंतरची आठवण सांगा," सौ. नें आणलेली द्राक्षांची बशी दादांपुढे करीत मी म्हटलें.

"या क्षणीं बाबांच्या आठवणीनं द्राक्षाफळांचीच माधुरी माझ्या जिभेवर आली आहे," त्याच अवस्थेंत एक द्राक्ष तोंडांत टाकीत दादा म्हणाले. "ती पुंडलीकराव वकिलांची गोष्ट तुम्ही वाचली असेल."

"हो, वाचली आहे. पण तुम्ही ती साद्यंत सांगा."

"अहो, चार दिशांहून आलेले आम्ही चार उतारू मनमाडला भेटलों. मी धुळ्याला नोकरीला होतों, तिथून आलों होतों. पुंडलिकराव नांदेडहून. सगळ्यांना शिरडीलाच जायचें होतें. त्यामुळें मैत्री झाली. आम्ही कोपरगांवला आलों व तिथून पायींच शिरडीला यायला निघालों. वाटेत एका ओढ्यापाशीं थांबलों व आमच्यापैकी एकाजवळ चिवडा होता तो सर्वांनी खाल्ला. तो अतिशय तिखट लागला म्हणून एकानें सुचविल्यावरून पुंडलीकरावांजवळचा नारळ फोडून आम्ही खाल्ला. मग आठवण झाली कीं वासुदेवानंदांनी बाबांना देण्यासाठीं जो नारळ पुंडलिकरावांजवळ दिला होता तोच फोडला गेला. आम्ही अत्यंत दुःखी अंतःकरणानें बाबांपुढें जाऊन बसलों. तोंच बाबांनी विचारलें, 'माझ्या बंधूंनी (स्वामींनी) माझेसाठी दिलेली वस्तु कुठें आहे ?' स्वामींनी तो नारळ दिला व आम्ही तो फोडून खाल्ला ह्या दोन्ही गोष्टी बाबांना माहीत होत्या. मग आम्ही काय बोलणार ? पुंडलीकरावांनी क्षमा

भाकली व ते दुसरा नारळ आणण्यास निघाले. पण बाबांनी त्यांना थांबवून म्हटलें, 'पुंडलिकराव, दुसरा एक नव्हे, तर हजार नारळ देऊनही त्या नारळाची भरपाई होणार नाहीं. तो नारळ नव्हता, तें माझ्या बंधूचें हृदय होतें.' आम्ही स्फुंदून स्फुंदून रडूं लागलों. पण बाबा शांतपणें नि प्रेमानें बोलत होते. काय तें प्रेम ! माउलीचें आपल्या तान्ह्यावरही नसेल इतकें बाबांचें भक्तांवर प्रेम होतें. ईश्वरच असें प्रेम करूं शकतो.........."

आणि हें म्हणतां म्हणतां दादांचा कंठ भरून आला नि तोंडांतून शब्द निघेनासा झाला. हुंदका आवरून ते म्हणाले, "बाबा यत्किंचितही रागावले नाहींत. अत्यंत प्रेमळ शब्दांत त्यांनी आम्हांस उपदेश केला. ते म्हणाले, "अरे, मुलांनी नारळ खाल्ला म्हणून बाप रागावेल का ? तर नारळ खाल्ल्याबद्दल तुम्ही वाईट वाटून घेऊं नका पण माणसानं आपल्याला सांगितलेलें काम लक्ष लावून करावें. त्यांत दुर्लक्ष करू नये. आणि 'आम्ही नारळ फोडून खाल्ला' असें म्हणण्यांत जो अहंकार आहे तो टाका. माझ्याच संकल्पानें तो नारळ फुटला. कारण त्या निमित्तानें तुमचा अहंकार मला घालवायचा होता.' असें बोलून जणुं आमचें किल्मिष बाबांनी धुवून टाकलें.

"दादा अगदी खास तुमची अशी एकादी आठवण सांगा ना."

"अहो, आठवायला लागलं कीं आठवणी गर्दी करून सोडतात. पण एक आठवण अगदीं वैशिष्टयपूर्ण आहे. त्या एका घटनेनं बाबांनी मला कायमचं आपलं कसं केलं तें सांगतों."

"म्हणजे ही घटना कुणाला माहितही नसेल ?"

"नाहीं, मी हें कुणाला सांगत नाहीं. पण तुम्ही भक्तिभावानें विचारतां म्हणून सांगतों. मी त्या वेळीं इंदूर संस्थानांत नोकरीला होतों. सुरवातीला पांच रुपये पगार होता. पण रुपयाला ३४ शेर गहूं तिथें मिळत होते."

"दादा, हें आपलं नुसतं ऐकायचं आतां."

"हो, ते दिवस परत यायचे नाहींत. तर आमचा पगार वाढत वाढत १०-०० रुपये झाला. पण त्यांतून जिद्दीनें १५ रु. साठवून शिरडीस आलों. बाबांपुढं येऊन हात जोडून बसलों. बाबांनी पाहिलें, पण काहीं बोलले नाहींत. सबंध दिवस मी मशिदीत बसून असें. पण माझं भाग्य काहीं उजळलं नाही. माझी पंधरा दिवसांची रजा अशाच स्थितींत संपली. पण बाबानी मला जवळ बोलावून माझ्या मस्तकावर हात ठेवीपर्यंत इथून हलायचं नाहीं, मग तिकडे नोकरीचं काहींही होवो, असा निश्चय करून शिरडींतच राहिलों. रोज दोन आणे डाळ-तांदुळाला लागत. असे चार महिने काढले. तरी बाबांची कृपा झाली नाहीं. पण मी दुःखी झालों का ? मुळींच नाहीं. माझ्या नोकरीचीच काय, पण माझी सगळीच काळजी बाबांनी घालवून टाकली होती. पण शेवटीं माझे जवळ जेव्हां फक्त आठ आणे उरले तेव्हां मात्र मी आपणहूनच बाबांना

नमस्कार करण्यासाठी गेलों. तों एकदम माझ्यावर ओरडून ते म्हणाले, "कशाला राहिलाहेस इथें ? चालायला लाग इथून."

'कुठं जाऊं, बाबा ?' मी विचारलें.

'जा आपल्या घरीं, नोकरीवर. तुझं काम झालं.'

बाबांच्या त्या दोन शब्दांनंतर मी पुढें कांहींच बोलायला नको होतें. पण मी अज्ञानी. मी म्हटलें, 'बाबा, माझ्याजवळ फक्त आठ आणे उरले आहेत. त्यांतून मी कुठें नि कसा जाऊं ?'

'इथून कोपरगांवला जा नि तिथून आपल्या घरीं जा,' बाबा म्हणाले, व त्यांनी माझ्या मस्तकावर हात ठेवला. झालें. मी आनंदांत न्हाऊन निघालों.

कोपरगांवला येऊन विचार करीत होतों कीं आतां आठ आण्यांत कुठे नि कसें जावें ? इतक्यांत, त्या दिवशींच्या तारखेचा स्टँप असलेलें कोपरगांव ते इंदोर असें कोरें करकरीत तिकीट एका खेडवळानें माझ्या हातांत देत म्हटलें, 'हें घ्या, बाबांनी तुम्हाला तिकीट दिलंय्.'

मला इतकं आश्चर्य वाटलं कीं तें सांगतांच येत नाहीं. डोळे पाण्यानें डबडबले. केवढी ही बाबांची कृपा ! केवढी भक्ताची काळजी ! डोळे पुसून मी पाहूं लागलों तर तो मनुष्य होताच कुठं ?

मी रीतसर गाडींत बसलों नि इंदूरला आलों. एक आण्यांत भरपूर पुरी-भाजी (तुपांतली) मिळे. एक आण्याचें गरम कटोराभर दूध. त्या खुषींत मी असें दोनदां घेतलें आणि तरी चार आणे कडोसरीस लावून घरीं आलों.

दुसऱ्या दिवशीं भीतभीतच कचेरींत गेलों. पण मी इतके दिवस शिरडीस होतों हें ऐकून मलाच सर्वांनी हात जोडले व उदी-प्रसाद मागून घेतला. नोकरीबद्दल कोणी कांहीं न विचारतां मी कामावर रूजू झालों. तेव्हांपासून बाबांची माझ्यावर कृपा आहे व तिचा अनुभव मी क्षणाक्षणाला घेत आहें."

"दादा, चार महिने तुम्ही शिरडीला होतांत. तर बाबांचा दिनक्रम नि बाबांचें एकंदर वर्णन सांगा ना."

"बाबांचा घड्याळ लावल्यासारखा किंवा ठराविक छापाचा असा दिनक्रम नव्हता.

**निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ।**

अशी साक्षात् स्थिति होती बाबांची. सच्चिदानंदाशीं सर्वथा एक झालेले होते बाबा. स्वतः त्यांच्या तोंडून किंवा अगदी जवळच्या अशा भक्तांकडूनही बाबांचें नांवगांव मला काहींच कळलें नाहीं. अजूनही तें मला माहीत नाहीं. परमात्म्याचें नांवगांव कुणाला ठाऊक आहे का ? आपल्या समाधानासाठी आपलं वैकुंठ, कैलास असं काहीं तरी म्हणायचं.

मशिदींत दीडवीत रुंदीची फळी खरोखर चिंध्यांनी टांगलेली होती. परंतु बाबा तिच्यावर कधीं चढत व उतरत नि तिथें कसे झोपत हें पण मला चार महिने राहूनही कळलें नाहीं. मशिदींत बाबांची रोजची साधना अशी काहींच नसे. पण लेंडीबागेंत जाऊन ते काहीतरी करीत असावेत असें आम्हाला नेहमी वाटे.

बाबांचें व्यक्तिमत्व अलौकिक होतें. दिव्य दृष्टि होती त्यांची. ती दृष्टि जणुं क्ष-किरणांप्रमाणें भक्तांच्या मनांतलें नि हृदयातलें 'पाहूं' शके. शेकडो मैलांवरचेंही त्यांना त्यामुळे प्रत्यक्ष होत असे. गव्हाळी रंगाची त्यांची मुखचर्या एका दृष्टिक्षेपात पाहाणाऱ्याला आपलासा करून घेई. अजूनही त्यांची ती तेजस्वी मुद्रा मला स्पष्ट आठवते."

"दादा, बाबा सांगून गेले आहेत की—

**'जरी मी गेलो हें शरीर टाकून**
**तरी मी धावेन भक्तांसाठीं'**

याबद्दल तुम्हाला काय अनुभव आलाय् ?"

"अहो, हाच अनुभव मी जगतोंय. पण एक दोन विशेष प्रसंग सांगतों.

एकदां माझ्या छातींत दुखत होतं. रात्रीं बाम किंवा तेल लावून झोपावे असा विचार करीत मी अंथरुणावर पडलो व मला तशीच झोप लागली. झोपेंत मला भास झाला कीं कुणीतरी माझ्या छातीला तेल लावून चोळतं आहे व छातीतलं दुखणं कमी होतंय्. कोण चोळतंय् तें कांहीं दिसत नव्हतं. पण, 'हं, बरं वाटेल हं आतां,' असे शद्ब मला ऐकूं आले व त्यावेळी मी जागा झालो. पाहातों तों माझ्या छातीला चक्क कसलं तरी औषधी तेल लावलेलं होतं नि छातीतलं दुखणं पार गेलं होतं. माझ्या साई माउली शिवाय कुणीं हें केलं असणार ?

झोपण्यापूर्वीं बाबांच्या नांवाची माळ ओढण्याचा माझा नेम आहे. एकदां झोपेत बाबा माझ्यापुढें प्रकट होऊन म्हणाले, 'ऊठ, माळ हातांतून पडलीय ती उचल आधी.' त्या शब्दानी मी जागा झालों नि पाहिलें तो अंथरूणावर माळ पडलेली होती. तेव्हां आठवलं कीं मी झोंपण्यापूर्वी माळ ओढायला सुरूवात केली होती परंतु ती पुरी झाली नव्हती. अर्थात् झोपेनं माझ्यावर अंमल गाजवला आणि माळ हातांतून गळून पडली. पण आपल्या भक्ताचा नित्यनेम चुकूं नये याची बाबांना केवढी काळजी ! त्यांनी मला जागविलें नि नेम पूर्ण करून घेतला. हेंच बाबा नेहमी करीत आले आहेत.

**'काय वानूं मी या संतांचे उपकार। मज निरंतर जागवीती ॥'**"

"बाबांच्या आरत्या, पदें वगैरे तुम्ही काय म्हणतां ?"

"मी स्वत:च केलेलीं वेडींवाकडी पदें आपल्याशींच गुणगुणत असतों झालें !"

"दादा, उशीर झालाय् म्हणून मी कांहीं फार सांगत नाहीं, परंतु अगदी एकच म्हणून दाखवा—"

काहीएक आढेवेढे न घेतां दादांनी खणखणीत नि गोड आवाजांत एक पद म्हटलें. त्यातल्या भक्तिभावानं आम्ही भारावून गेलों. ते पद असें :—

( राग – खमाज; ताल – त्रिताल. )

**गुरुराया तुजला मागतसें मी—ध्रु.**
**तव भजन पूजन मनन ध्यान घडो मशिं**
**विषयरसीं न जडो मति —१**
**दीन पतित मी शरण तुज आलों**
**तूंचि जगीं मज त्राता —२**
**तुझिये पायीं वसति सकल गुण**
**आश्रय तूं सुजनांला —३**
**तूंचि जगाला ज्ञान देउनी**
**शिकविसि थोरपणाला —४**
**विनयें नमितों बहुदिन श्रमलों**
**त्वत्पदिं नेईं अनंता —५ "**

"झालंय्, वाढूं का ? " आंतून सौ. नं सूचना दिली.

"काय दादा, वाढायचं ना ? " मी विचारलें.

"हो, वाढायचं. कारण ह्या बाबांच्या गोष्टी कधींच संपायच्या नाहीत," दादा म्हणाले.

"तरी आज खूप ऐकायला मिळालं. तुमच्या सारख्यांच्या आठवणी आतां अशाच विचारून विचारून जतन करून ठेवल्या पाहिजेत," मी.

जेवतां जेवतां दादा म्हणाले, "मुलगा बापाची एकसष्टी करतो अशीं खूप उदाहरणें आहेत परंतु मी मात्र माझ्या मुलाची मागल्या वर्षी एकसष्टी केली ! एवढं सुखी आयुष्य बाबांनी मला दिलं, आतां आणखी काय मागायचं राहिलंय ? "

सावकाश जेवण खाण आटोपल्यावर आमच्याकडील बाबांच्या फोटोला त्रिवार नमस्कार करून दादा निघाले. आमचेकडे येताना त्यांची नात सोबतीला आली होती. परत जाताना दादा 'नको, नको' म्हणत असतांही आमची स्नुषा त्यांना घरापर्यंत सोडून आली.

# श्रीसाई कीर्तनमाला

## पुष्प सहावें

लेखक ह. भ. प. (प्रा.) द. दि. परचुरे.

**साधुबोध झाला नुरोनियां ठेला । ठायींच मुराला अनुभव ।। १ ।।**
**कापुराची वाती उजळली ज्योती । ठायींच समाप्ती झाली जैशी ।। २ ।।**
**मोक्ष रेखे आला भाग्यें विनटला । साधूंचा अंकिला हरिभक्त ।। ३ ।।**
**ज्ञानदेवा गोडी संगतीं सज्जनीं । हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्वीं ।। ४ ।।**

ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रसिद्ध अशा हरिपाठांतला हा सहावा अभंग आहे. महाराजांनी इतर खूप लिहिलें असलें तरी हरिपाठांत त्यांनी आपल्या अनुभवाचें सार अगदीं सर्वसामान्य लोकांच्या आटोक्यांत आणून ठेवलें आहे. हरिपाठाचे सत्तावीस अभंग म्हणजे कांहीं स्फुट अभंग नसून त्यांमध्यें संगति व एकजिनसीपणा आहे. एका अभंगातूनच दुसरा, त्यांतून तिसरा अशी साखळी तयार होते. याच्या आधींच्या म्हणजे पांचव्या अभंगाच्या शेवटीं महाराज सांगतात– "**ज्ञानदेव सांगे दृष्टान्ताची मात । साधूचे संगतीं तरणोपाय ।।**" जगांत कित्येक गोष्टी पैशानें मिळतात, परंतु कांहीं गोष्टी पैसे खर्चूनही मिळत नाहींत. आई-बाप व सगे-सोयरे यापैकीं होत. चांगले आईबाप व बंधुजन मिळणें हें पूर्वसुकृतामुळेंच घडतें. वामन पंडित म्हणतात:- "**हा लाभ पूर्वसुकृता विण काय होतो ?**" परंतु याहीपेक्षां आयुष्यांत सत्संग घडणें हें महद्‌भाग्य होय. मग ज्याला केवळ संतसंग घडला असें नव्हे, तर त्या संतांनी ज्याला बोध देऊन कृतार्थ केलें, त्याचें भाग्य काय वर्णावें ? माउली म्हणते, "साधु बोध झाला" म्हणजे काय होतें ? तर "नुरोनियां ठेला" आणि "ठायींच मुराला अनुभव." या साठीं कापुराचा दृष्टान्त महाराजांनी दिला आहे. कापूर पेटूं लागला कीं तो स्वतःच सरतो व त्या बरोबर त्याला जाळणारा अग्नीही सरतो. जगांतलीं जीं इतर ज्ञानें आहेत तीं फुंज उत्पन्न करणारीं आहेत. त्या ज्ञानाचा 'दर्प' येतो. परंतु साधूंनी दिलेलें ज्ञान असें नाहीं. तें ज्ञान भ्रांतिरूप अज्ञानाचा नाश तर करतेंच, पण नंतर तें स्वतः '**अहं ब्रह्म**' या भावनेंत स्वतःच विरून जातें. महाराज सांगतात कीं साधूंच्या बोधामुळेंच मला सर्वत्र हरि दिसूं लागला. इतर कोणीही ही दृष्टी मला दिली नसती. संसारी जीवांवर संतांचे केवढे उपकार आहेत हे !
तुकारामबोवा म्हणतात—

(अभंग)

**काय द्यावें यांसी व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ।।**

या संतांचे उतराई होण्यासाठीं त्यांच्या पायावर जीव ठेवला तरीहि थोडाच होईल. मागें सांगितल्याप्रमाणें बाकी गोष्टी विकत घेतां येतील, पण संतसंग भाग्यानेंच

मिळेल. साधुसुंदरदास यांचें एक सुंदर हिंदी पद आहे त्यांत संतसमागम अत्यंत दुर्लभ कसा हें त्यांनी सांगितलें आहे---

(दोहरा सवाई)

**मात मिले, पुन तात मिले, सुत भ्रात मिले युवती सुखदाई ।**
**राज मिले, गजराज मिले, सब साज मिले, घर संपत आई ।।**
**लोक मिले, परलोक मिले, सत लोक मिले, वैकुंठ हि जाई ।**
**कहे सुंदर और मिले सब, संत समागम दुर्लभ भाई ।।**

भार्या-पुत्रांची माया ही आपल्याला गुंतविते, बद्ध करते, आत्मसुखापासून दूर करते. समर्थ सांगतात '**येर तीं माईक दुःखाचीं जनितें**''. साधूंची संगत अशी नव्हे. ती आपल्याला स्वानंद साम्राज्यात सिंहासनीं नेऊन बसविते.

पद

**भार्या कोणाची ? तशि ही दौलत कोणाची ? ।**
**सखे सोयरे परिजन सारे संतति कोणाची ? ।।**
**लक्ष्मी जो खर्ची, ममता करिताती त्याची ।**
**परिणामीं हे येति न कामीं, ज्याचा तो तोची ।।**
**साधुसंगतीची, अंतीं ईशप्राप्तीची ।**
**आशा धरितो तोचि करीतो सार्थकता तनुची ।।**

बाकीच्या लोकांचा विश्वास धरवत नाहीं. संतांचा मात्र पूर्ण विश्वास धरतां येतो. कारण, तुकारामबोवा म्हणतात, '**तेचि माझें हित करिती सकळ**'. महाराज सांगतात--

( अभंग )

**संतांचिया पायीं हा माझा विश्वास ।**
**सर्व भावें दास जालों त्यांचा ।**
**भागलिया मज वाहतील कडे ।**
**त्यांचियानें जोडे सर्व सुख ।।**

साधुबोधावर निरूपण करतांना हें साधुसंगतीचें माहात्म्य सांगावें लागतें याचें कारण असें कीं साधुसंगति म्हणजेच साधुबोध. किंबहुना साधु मुखानें कांहींच बोध न करतांहि शिष्याला कृतार्थ करतात. "**गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्ते छिन्नसंशयाः ।**" कारण चंदनाचा स्वभाव ज्या प्रमाणें ताप निवारण करण्याचा आहे, त्याप्रमाणें संतांचा स्वभाव तापत्रय दूर करण्याचा आहे.

**गंगा पापं, शशी तापं, दैन्यं कल्पतरुस्तथा ।**
**पापं तापं च दैन्यं च हन्ति साधुसमागमः ।।**

याच प्रमाणें चंद्राचें उदाहरण देऊन शंकराचार्य म्हणतात—

**अयं स्वभावः स्वत एव यत्परश्रमापनोदप्रवणंमहात्मनाम् ।**
**सुधांशुरेषः स्वयमर्ककर्कशप्रभाभितप्तामवति क्षितिं किल ।। (विवेकचूडामणि)**

संतसंग हाच बोधकारक आहे असें समर्थहि सांगतात—

**तो वेद कोणासही । दाखवूं शकेना......**
**तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे ।। (दासबोध १।५)**

माउलीनें गंगेचें व सूर्याचें उदाहरण या साठीं दिलें आहे.

**" फेडीत पापताप । पोषीत तीरींचे पादप । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ।।**
**कीं जगाचें आंध्य फेडितु । श्रियेचीं राउळें उघडितु । निघे जैसा भास्वतु । प्रदक्षिणे ।।**
**तैसीं बांधलीं सोडीत । बुडालीं काढीत । सांकडीं फेडीत । आर्तांचिया ।।**
**(ज्ञानेश्वरी १६।१९९–२०१)**

सत्संगतीनें कोणकोणत्या गोष्टी घडून येतात याचें सुंदर वर्णन भर्तृहरीनें नीति–शतकांत केलें आहे. (श्लोक - व. ति.)

**जाड्यं धियो हरति, सिंचति वाचि सत्यं ।**
**मानोन्नतिं दिशति, पापमपाकरोति ।।**
**चित्तं प्रसादयति, दिक्षु तनोति कीर्तिं ।**
**सत्संगतिः कथय किं न करोति पुसांम् ।।**

मनुष्याचें शरीर अन्नावर पोसलें जातें व त्याची उत्पत्ति स्त्रीपुरुष संयोगापासून होते. म्हणून सर्व वासनांच्या मुळाशीं अन्न व कामेच्छा हे हेतु असतात. अन्नाचें पर्यवसान वीर्यांत व रेतांत होतें. त्याला कोणती गति द्यावयाची हें विचाराचें काम आहे. साधारणतः वीर्याला व रेताला अधोगति मिळते. परंतु याच्या ऐवजीं ओजस् किंवा तेज यांत त्यांचे पर्यवसान व्हावें अशी संतांची योजना असते. हें कार्य संत आपल्या उदाहरणानें किंवा संगतीनें अगदीं नकळत सहज असें घडवून आणतात. **'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति'**. पण हें कल्याण कोणतें ? बायको, पैसा, इत्यादि नव्हे. तर पंचविषयांची आसक्ति नाहींशी होणें हेंच जीवांचें सर्वांत मोठें कल्याण. ज्ञान-गीतेंत म्हटलें आहे—

**सत्संगेन परं प्राप्य दुस्तरं तरतेऽचिरात् ।**
**तस्मादतिप्रयत्नेन सत्संगं सततं कुरु ।।**

महात्मा तुळशीदास तर म्हणतात कीं स्वर्ग आणि मोक्ष यांचें सुख हें लवमात्र सत्संगाच्या तोलाला पुरणार नाहीं–

**(दोहा)**

**सर्व स्वर्ग अपवर्ग सुख धरिय तुलाइक अंग ।**
**तुलै न ताहि सकल मिलि जो सुख लव सत्संग ।।**

भर्तृहरि म्हणतात कीं हे संतसज्जन दुसऱ्यांच्या गुणांचा हेवा न करतां उलट वाहवा करणारे व दोषांचा नाश करणारे असतात--(श्लोक शा. वि.)

**ज्यांचीं देहमनें तशींच वचनें पुण्यामृतें वोतिलीं ।**
**कीं जीं हीं स्वकृतोपकारविभवें सर्वत्र विस्तारिलीं ।।**
**लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरूपरी मानिती ।**
**चित्तीं तोषहि पावती सुजन ते नेणों किती नांदती ।।**

या प्रमाणें लोकांच्या गुणांचा विकास करून त्यांना परमोच्च दशेला नेऊन पोंचविणें हेंच संतांचें कार्य असतें. अत्यंत दुर्लभ अशा वस्तूंचा लाभ संत आपल्याला करून देतात आणि संत स्वत: वस्तुरूप (परमात्मरूप) झालेले असल्यामुळें ते हें कार्य सहज घडवितात. 'विवेक चूडामणि' ग्रंथात शंकराचार्य सांगतात--

**शान्ताः महान्तः निवसन्ति सन्तः । वसन्तवत् लोकहितं चरन्तः ।**
**तीर्णाः स्वयं भीमभवार्णवं जनान् । अहेतुनान्यान पितारयन्तः ।।**

नामदेवरायांनी सांगितलें आहे कीं

**संतचरणरज लागतां सहज ।**
**वासनेचें बीज जळोनि जाय ।।**
**मग रामनामीं उपजे आवडी ...।।**

ज्या वासनेमुळें जन्ममरण व कर्मबंधन ती वासनाच संतसंगानें बीजासकट जळून जाते.

विषयानंदाकरितां कर्ता, कर्म व कार्य या त्रिपुटीची आवश्यकता असते. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पंचविषयांच्या घरीं दान किंवा भीक मागितल्याशिवाय श्रीमंतालाहि आनंद नाहीं. या दृष्टीनें सकलैश्वर्यसंपन्न राजाही भिकारीच. उलट, वस्तुरूप होऊन राहिलेले साधु सदैव आनंद भोगतात व इतरांनाहि मुक्तहस्तानें देतात. पैठणकर दत्तमहाराज 'स्वानंदतरंग' ग्रंथात म्हणतात--

**(ओवी)**

**आम्ही भोगितों अखंडानंद । सहजावस्थीं सदैव धुंद ।।**
**ऐसा सुखमयकंद । तूंही होआवें ।।**

कोणतीही गोष्ट असो वा नसो. साधुसंतांना त्याचें सुखदुःख कांहींच नसतें. अमृतरायांचें यावर एक गोड पद आहे :--

**होतां सद्गुरु वरदान । प्राप्त झालें ब्रह्मज्ञान ।**
**तेथें संसाराचें भान । आहे आहे, नाहीं नाहीं ।।**
**सेवितां श्रीगुरुकुल । ब्रह्म त्रैलोक्य गोकुळ ।**
**दारा पुत्र अनुकूल । आहे आहे, नाहीं नाहीं ।।**

पोट मात्र भरायास । न करी कोठेंही सायास ।
तुटकें खेटर पायास । आहे आहे, नाहीं नाहीं ॥
होतां अंतरीं निष्काम । मुखीं आलें रामनाम ।
तेथें मृदंगाचें काम । आहे आहे, नाहीं नाहीं ॥
साच अमृत परमार्थ । न करी कोणासी वादार्थ ।
घरीं लागला पदार्थ । आहे आहे, नाहीं नाहीं ॥

संगति हीच गुणदोषांना कशी कारण होते याचें सुंदर उदाहरण वामन पंडितांनी दिलें आहे. ते म्हणतात :– (श्लोक - शा. वि.)

तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त लोहावरी ।
तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी ।
तें स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें ।
जाणा उत्तममध्यमाधमदशा संसर्गयोगें टिके ॥१॥

या संगतीविषयीं एक गोष्ट सांगतों. एका राजानें दोन सुंदर पोपट विकत घेतले. त्यांना निरनिराळ्या धर्मांचे शिक्षण द्यावें व मग राजवाड्यांत त्यांना शेजारीं पिंजऱ्यांत ठेवून लोकांना त्यांचे कौतुक दाखवावें असा विचार करून राजानें एका पोपटाला एका वेदशास्त्रसंपन्न सदाचाररत शास्त्रीबोवांकडे ठेवलें व दुसऱ्याला एका यवन फकिराकडे ठेवलें. एका वर्षानंतर राजाने ठरविलें कीं त्यांची प्रगति कशी झाली आहे तें पहावें. म्हणून प्रथम तो शास्त्रीबोवांकडे गेला. राजाला पाहतांच पोपट अस्खलित गीर्वाण भाषेंत बोलूं लागला,

**"सुस्वागतम् । इदमासनं अलंक्रियतां भवता । कः वंशः आर्येण भूषितः, कतमः वा विरहपर्युत्सुक जनः कृतः देशः ।"**

राजाला परमाश्चर्य वाटलें. काय ती भाषेची ऐट आणि सौंदर्य ! "यावें महाराज. हें आसन आपल्या कडून अलंकृत केलें जावो. आर्यांनी जन्म घेऊन कोणता वंश भूषविला आहे व इथें येऊन कोणत्या देशांतील लोकांना विरहाकुल केलें आहे ?" भाषेचा हा डौल व सौजन्य एकट्या 'संस्कृत' भाषेचेंच, व या पोपटानें तें बरोबर आत्मसात् केलें होतें. म्हणून शास्त्रीबोवांना व पोपटाला धन्यवाद देऊन राजा फकिराकडे गेला. पाहातो तों तिथला पोपट भयंकर आचकट विचकट बोलतच होता. राजाला पाहून तर त्यानें बीभत्स शिव्यांचा भडिमार सुरू केला. राजानें दोन्ही पोपटांना राजवाड्यांत हजर करण्यास सांगितलें. सेवकांनीं त्यांना आणल्यावर राजानें आज्ञा केली कीं "या शास्त्रीबुवाकडच्या पोपटाला सोनेरी पिंजऱ्यांत ठेवून त्याची सर्व प्रकारें निगा राखा आणि या फकिराकडच्या पोपटाचा ताबडतोब शिरच्छेद करा !" हें एकून दुसऱ्या पोपटानें उरल्या सुरल्या शिव्या देऊन भर सभेंत राजाचा पितरांसह 'उद्धार' केला. पण पहिला पोपट म्हणाला, "अरे राजा, असें कां करतोस ? हा सगळा

संगतीचा परिणाम आहे. त्या माझ्या भावाला आतां शास्त्रीबोवांकडे ठेव, म्हणजे तोही सुधारेल. राजा,

(श्लोक–व. ति.)

**मी बोलतों मधुर ना गुण या जनाचा ।***
**तो बोलतो कुटिल हा नच दोष त्याचा ।**
**जी संगती गुण लयास तसाच लागे ।**
**दुष्टेंचि दुष्ट, परि सज्जन साधुसंगें ।।१।।**

( *'अयं जनः' या संस्कृतचें भाषांतर. )

साधूंच्या संगतींत जीवांना बोध होतो म्हणूनच 'साधुबोध झाला' असें माउलीनें म्हटलें आहे. एवढ्यासाठीच साधुसंगतीचें इतकें महत्व वर्णन केलें. साधूंचा बोध म्हणजे **'तत्वमसि'** महावाक्याचा बोध. पांडित्यानें किंवा ग्रंथवाचनानें हा बोध होणार नाहीं. शूद्रानें तीन रेखा ओलांडताच ज्यांच्या कृपेनें तो वेदसंपन्न विप्र झाला असे अधिकारी **'समर्थ'** पुरुषच हा बोध सच्छिष्याला करूं शकतात. हा बोध झाल्यानंतर

**'भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयाः ।**
**क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ।। (मुंडक)**

अशा स्थितीला साधक येऊन पोहोंचतो. तिथें मग जाणतेपणाचा अभिमान जिरतो व तुकोबा म्हणतात त्या प्रमाणें **'जाणोनि नेणतें करी माझें मन'** अशा अवस्थेंत साधक दृढ होऊन राहातो. भगवान व्यास हेंच सांगतात—**'येन त्यजसि तत् त्यज'** (म. भा. शांति पर्व). ज्या साधनांनी या ठिकाणीं येऊन पोंचायचें त्या साधनांच्याही उपाधींतून सुटणें म्हणजेच मुक्त होणें किंवा मुक्ति मिळणें. नाथ म्हणतात, **'जंव जंव काष्ठसंभार असे । तंव तंव अग्नि जाळी उल्हासें । सरलेनि काष्ठ लेशें । अग्नि प्रवेशे निजतेजीं ।।** (ए. भा. ९।८३). ज्ञानेश्वर महाराज सांगतात कीं **'साधूंचा अंकिला हरिभक्त'** असा जो कोणी भाग्यवान असेल त्यालाच हें मोक्षसुख लाभेल. महाराज स्वानुभवानें म्हणतात कीं हे साधूच मला हरीची प्राप्ति करून देतात, म्हणून त्यांच्या संगतीची मला फार गोडी वाटते–**'ज्ञान देवा गोडी संगतीसज्जनीं'**. म्हणून महाराज प्रथम पद्यांत सांगतात–

**साधुबोध झाला नुरोनियां ठेला । ठायींच मुराला अनुभव ।**

# संत एकनाथांचं भावार्थ रामायण

डॉ. माधवराव दाभाडे,
एम्.ए.,पीएच्.डी.

महाराष्ट्र म्हणजे महान लोकांचं राष्ट्र असाही या शब्दाचा अर्थ आहे. तेव्हा महान म्हणजे हिमालयासारखी ऊंच विचारांची माणसं ज्या भूभागात होऊन गेलीत तो भाग. यात अर्थातच संतांचा समावेश होतो. कारण संतांचं कार्य सदासर्वकाळ नवचैतन्य देणारं असतं. या पैकी संत एकनाथ यांचं नाव माहीत नाही असा मराठी बोलणारा मनुष्य असेल असं वाटत नाही. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत रामदास हे महाराष्ट्राचे पंचप्राण होत. यात संत एकनाथांचं नाव मध्यभागी आहे. कारण एकीकडे त्यांना संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांच्या-मुळे स्फूर्ती मिळाली तर दुसरीकडे त्यांनी संत तुकाराम आणि संत रामदास यांना स्फूर्ती दिली असं म्हणायला हरकत नाही. संत एकनाथांची ग्रंथसंपदा फार मोठी आहे. त्यांनी आपल्या आचरणानं प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून दाखविली. संत एकनाथ किती थोर होते याचं फक्त एकच उदाहरण देतों आणि मग त्यांच्या भावार्थ रामायणाकड वळतो.

एकदा असं झालं की नाथांच्या घरीं श्राद्ध होतं. अर्थात्‌च श्राद्धानिमित्त नाथांच्या घरी काही गोडधोड पदार्थ तयार होत होता. त्या सुग्रास अन्नाचा वास घराबाहेरील रस्त्यापर्यंत येत होता. तेव्हा रस्त्यानं जाणारे अस्पृश्य बांधव आपापसात बोलू लागले,

"सुग्रास अन्नाचा किती छान वास येतो, नाही !" हे बोलणं ऐकताच नाथांनी

"अहो ! माझ्या बंधुभगिनींनो !" असं म्हणून त्यांना मोठ्या प्रेमानं हाक मारली. आणि ते अस्पृश्य बांधव नको नको म्हणत असताच आपल्याघरी मोठ्या आदरातिथ्यानं नाथांनी त्यांना पोटभर जेऊ घातलं. त्या दिवशी त्या अस्पृश्य बंधु-भगिनींना किती बरं वाटलं असेल! अशी नाथांच्या करुणेची किती उदाहरणं सांगावीत !

आपल्या महाराष्ट्रात संत एकनाथ होऊन गेलेत आणि त्यांनी भागवत धर्माची पताका फडकत ठेवली याचा आपल्याला मोठा अभिमान वाटला पाहिजे.

आज विसाव्या शतकात स्वातंत्र्य मिळून सव्वीस वर्षांचा काळ लोटला तरी धर्माधर्माच्या द्वेषातून, जातीयतेच्या जंजाळातून, प्रांतीय भावनेच्या बुरख्यातून आणि स्वार्थीय वृत्तीतून आपली सुटका झालेली नाही. शुद्ध आचरण, न्याय, नीति, प्रेम आणि सहिष्णुता यांचा भाषणातून प्रचार करणारे पायलीला पंधरा मिळत असतांना-सुद्धा माणुसकीचा महिमा आपल्या मनात अद्याप रुजलेला नाही, हे कटू सत्य आहे. परंतु अज्ञान अंधकारात आम जनता अवघडून पडलेली असतांना आणि मुसलमानी राज्याचा भस्मासुर थय्‌थय्‌थय्‌थय्‌ नाचत असतांना संत एकनाथांनी केलेलं कार्य

खरोखरच महान आहे. अत्यंत विरोधी परिस्थितीत नाथांनी लोकांना न्याय, नीति, प्रेम आणि हरिभक्ती यांची गोडी लावण्याचा जो प्रयत्न केला तो पाहून अंतःकरण आजही आदरानं भरून येतं. आज ना उद्या चांडाळांचा काटा काढण्याचं कार्य भगवंत करीलच करील अशा आत्मविश्वासाचा नंदादीप नाथांनी सतत तेवत ठेवला. सामाजिक समतेच्या स्थापनेसाठी, आम जनतेच्या कल्याणासाठी आणि सर्वांच्या अंतःकरणात अध्यात्माची गोडी निर्माण करण्यासाठी नाथांनी केलेल्या प्रचंड कार्यामुळं महाराष्ट्राचं लाडकं दैवत विठ्ठल रखुमाई प्रसन्न झालं आणि पुढं सतराव्या शतकात महाराष्ट्रात संत तुकोबांच्या आणि संत रामदासांच्या प्रयत्नामुळं भक्तीचं अमाप पीक आलं आणि श्रीशिवप्रभूंनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. संत एकनाथांना अधर्माची किती चीड येत होती ते पाहा,

**धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।**
**तैं आम्हा येणे घडे । संसारस्थिती ॥**
**नाना मते पाषांड । कर्मठता अति बंड ।**
**तयांचे ठेचणे तोंड । हरिभजने ॥**

हे सत्कार्य करण्यासाठी नाथांच्या अंतःकरणात हरिभक्तीचा पूर सतत ओसंडत होता. ते म्हणतात.

**भाग्याचा उदय झाला । संतसंग मज घडला ।**
**तेणे आनंदाचे पूर । लोटताती निरंतर ।**
**प्रेम सप्रेम भरते । अंगी उतार चढते ।**
**आली आनंद लहरी । एका जनार्दन निर्धारी ॥**

असा अनन्यसाधारण आनंदाचा अनुभव स्वतः संत एकनाथ सतत घेत होते. असं नसतं तर त्यांना समाजात भावभक्तीचा मळा पिकविता आला नसता. कारण आडातच नाही तर पोहऱ्यात तरी कोठुन येणार ? पण एवढं अद्वितीय सामर्थ्य नाथांना कसं लाभलं होतं ? याचं वर्णन आता त्यांच्याच तोंडून ऐकलेलं बरं, नाही का ? भावार्थ रामायणातील 'बालकांड' या ठिकाणी पहिल्या अध्यायात नाथ म्हणतात :–

**आता वंदू सद्‌गुरु । जो स्वानंद बोधवज्र पंजरू ।**
**ज्याचेनी हा संसारू । होय सुखकरू तरणोपाय ॥ २९ ॥**
**जेणे मस्तकी ठेविला हातू । अहंभावा होय घातू ।**
**सोहं भाव होय प्राप्तू । दावी अप्राप्तू अद्वयानंदू ॥ ३० ॥**
**जन तोची जनार्दन । जनार्दन सकळ जन ।**
**येका जनार्दना शरण । मी तू पण चिदान्वये ॥ ३१ ॥**

जनार्दना पढिये एकपण । एका पढिये जनार्दन ।
स्वरूप एक नामे भिन्न । अनन्य शरण या नाव ।। ३२ ।।
जनार्दन माझे मन । जनार्दन माझे नयन ।
जनार्दन वदते वदन । वक्ता वचन श्रीजनार्दन ।। ३३ ।।
जनार्दनु गतीची गती । जनार्दनु मतीची मती ।
जनार्दनु स्फुरे स्फूर्ती । सकळ व्युत्पत्ती जनार्दनु ।। ३४ ।।
निजांगे जो सकळ जन । या लागी नावे जनार्दन ।
लिंगदेहा करी मर्दन । या लागी जनार्दन व्युत्पत्तीव्याख्या ।। ३५ ।।
येथे तो कर्ता मी अकर्ता । हेही बोलणे अती मूर्खता ।
मी कर्ता तो अकर्ता । हे परममूर्खता सोलीव ।। ३६ ।।
या परी मी तू पण । दुरी दवडोनी जनार्दन ।
बोलवी भावार्थ रामायण । कथा निरूपण चालवी ।। ३७ ।।

म्हणजे मी भावार्थ रामायण सांगत नसून प्रत्यक्ष जनार्दन स्वामीच मजकडून सर्वकाही वदवीत आहेत असं एकनाथांनी स्पष्ट सांगितलं आहे. यावरून त्यांची सद्‌गुरु जनार्दन स्वामींच्या ठिकाणी किती निष्ठा होती याचा पुरावा पाहायला मिळतो आणि मग म्हणावंसं वाटतं की धन्य ते सद्‌गुरु आणि धन्य त्यांचे ते सत्‌शिष्य !

श्रीरामाच्या भक्तिरसाचा अनुभव संत एकनाथांनी कसा घेतला होता आणि ते रामकथा सांगण्यात कसे रंगून गेले होते हे पाहणं फारच बोधप्रद असं आहे. रामकथा वाचतावाचता भक्तीरसानं मन भरून जातं आणि आनंदाच्या उर्मी आपल्याही अंतःकरणात उचंबळून येतात एवढं सामर्थ्य या भावार्थ रामायणात आहे यात तिळमात्र शंका नाही. फक्त आपला भाव मात्र तसा पाहिजे. सुन्दरकांड या मध्ये श्रीरामाची कथा कशी भवतारक आहे याचं वर्णन नाथांनी किती सोप्या, सरळ आणि सुंदर भाषेत केलं आहे ते पाहा :–

श्रीरामे पावन कथा । श्रीरामे पावन वक्ता ।
श्रीरामे पावन श्रोता । श्रीराम स्वता ग्रंथार्थ ।। १ ।।
श्रीरामे धन्य धरणी । श्रीरामे धन्य करणी ।
श्रीरामे धन्य वाणी । जे रामायणी विनटली ।। २ ।।
श्रीरामे पावन संसार । श्रीरामे पावन चराचर ।
श्रीरामे पावन नर । जे तत्पर नित्य स्मरती ।। ३ ।।
रामनाम शुद्ध साधन । रामनाम शुद्ध ज्ञान ।
रामनामे सुटे बंधन । नाम पावन सर्वार्थ ।। ४ ।।
रामनामे सरते तोंड । रामनामे किष्किधाकांड ।
आता उरले सुंदरकांड । अती प्रचंड प्रतापी ।। ५ ।।

पहा रामनामाची थोरवी । श्रीराम आहे सर्वांतरी ।
रामनाम सत्वर उच्चारी । तेणें भवसागरी तरतील ॥ ६ ॥

संत एकनाथ सांगतात की स्वतः रामच ही रामकथा मजकडून वदवीत आहे आणि मी तर फक्त निमित्तमात्र आहे. या विषयी नाथांनी केलेलं वर्णन खरोखरच मोठं बहारदार असं उतरलं आहे. यावरून नाथ किती राममय झाले होते हे पाहायला मिळतं. संतवाणीला अमृतवाणी असं का म्हणायचं ? याचं उत्तर स्वतः संतांनीच सांगितलं आहे. प्रत्यक्ष रामच त्यांच्याकडून हे घडवीत आहे. याच कारणास्तव संत म्हणजेच परमेश्वर असं म्हणतात. एवढ्यासाठी ही संतवाणी महाराष्ट्राचं आणि या भारतभूमीचं फार मोठं धन आहे हे आपण सतत लक्षात ठेवलं पाहिजे. या संतवाणीला अंतःकरणात स्थिर करणं, ही संतवाणी भक्तीभावानं उच्चारणं, ही संतवाणी ऐकणं आणि या संतवाणीला ऐकवणं हे आपणासर्वांचं परम पवित्र, परमसुखदायी आणि पहिलं कर्तव्य आहे. एवढ्यासाठी 'युद्धकांड' यातील पुढील ओव्या वाचकांनी पुन्हा पुन्हा ऐकाव्यात अशा आहेत—

माझें जे वदते वदन । स्वये झाला रघुनंदन ।
वचनावचनी निर्वचन । कथा पावन श्रीरामे ॥ ७ ॥
श्रीराम कथेचा गुह्यार्थ । यथार्थ वदवी रघुनाथ ।
माझे हाती लेखणी दऊत । कथा लिहवीत श्रीराम ॥ ८ ॥
माझे दृष्टीचे देखणेपण । श्रीराम घेऊनी आपण ।
दावी कथा निरूपण । जागृती स्वप्न सुषुप्ती ॥ ९ ॥
जागृती स्वयें कर्म करिता । तव कर्मी प्रकटे श्रीरामकथा ।
स्वप्नी प्रकटे निजगुजवार्ता । होय सांगता श्रीराम ॥ १० ॥
सुषुप्ती करिता सुखे शयन । जेथे नाही जन्ममरण ।
नाही कर्मधर्माचरण । होय सांगता श्रीराम ॥ ११ ॥
करू बैसता भोजन । ग्रासोग्रासी रामायण ।
जेवणी गोड श्रीराम भजन । दावी आपण श्रीराम ॥ १२ ॥
चवी चाखता रसा आत । रसस्वाद श्रीरघुनाथ ।
करोनी भोजनाचा अंत । रामायणार्थ राम दावी ॥ १३ ॥
चाखू जाता रस स्वादन । रस रसना रघुनंदन ।
श्रीरामे स्वानंद भोजन । रामायण अती गोड ॥ १४ ॥
चाखतां रामायण गोडी । रस रसना रसत्व सांडी ।
दृष्टी दश्याते वोसंडी । जोडिता जोडी रामकथा ॥ १५ ॥
करू जाता सुखे शयन । विसरो नेदी रामायण ।
शेज बाज अंथरुण । होय आपण श्रीराम ॥ १६ ॥

**रामायण लिहावया अर्थी । जागृती स्वप्नी आणि सुषुप्ती ।**
**विसंबेना रघुपती । अहोराती रामकथा ॥ १७ ॥**

संत एकनाथांनी बालकांडांत राम आणि सीता यांचा जो अनुराग वर्णन केलेला आहे तो खरोखरच अप्रतिम असा आहे. तसं पाहिलं तर नाथांचं भावार्थ रामायण हा सर्वच ग्रंथ मोठा प्रासादिक, भक्तिरसपूर्ण आणि चित्तात हरिनामाचा अखंड झरा निर्माण करणारा आहे. त्यामुळं या एका लेखात काय घ्यावं आणि काय सोडावं असं झालं आहे. तरीही हा रामसीतेच्या अनुरागाचा वृत्तांत वाचकांनी मुद्दाम अवलोकन करण्यासारखा आहे.

**श्रीरामाच्या मनोगता । अनुकूल वर्ते सीता ।**
**सीतेचिया मनोरथा । परिपूर्णता श्रीरामे ॥ ७७ ॥**
**सीतेचा भाव श्रीरामी पूर्ण । राम सीतेसी संपूर्ण ।**
**सीता रामे सुखसंपन्न । सुखी रघुनंदन सीतेचेनी ॥ ७८ ॥**
**रामरसे रसज्ञ सीता । सीतेच्या रसने श्रीराम भोक्ता ।**
**श्रीराम देखणे सीता डोळसता । तिचेनी देखता श्रीराम ॥ ७९ ॥**
**श्रीरामे सीता सुंदरपूर्ण । सीतेने राम शोभे सगुण ।**
**श्रीरामे सीता सुलक्षण । सीतेचे लक्ष्य लक्षण श्रीराम ॥ ८० ॥**
**श्रीराम सीतेचा निजभोगू । सीतेचेनि श्रीराम रसरंगू ।**
**श्रीरामे सीता शोभे सांगू । सीता सर्वांगू श्रीराम ॥ ८१ ॥**
**सीता रस श्रीराम स्वाद । सीता सुमन श्रीराम सुगंध ।**
**सीता बुद्धी श्रीराम बोध । अनन्यसिद्धी येरयेरा ॥ ८२ ॥**
**सीता वचन श्रीराम वचनार्थ । सीता पद श्रीराम पदार्थ ।**
**सीता मुक्ती श्रीराम मुक्त्यर्थ । परम स्वार्थ येरयेरा ॥ ८३ ॥**
**सीता जीव राम जीवन । सीता मन राम उन्मन ।**
**सीता चित्त श्रीराम चैतन्य । आनंदघन येरयेरा ॥ ८४ ॥**
**सीता धरा श्रीराम धारक । सीता चळण श्रीराम चाळक ।**
**सीता व्याप्य श्रीराम व्यापक । सुखसंतोष येरयेरा ॥ ८५ ॥**
**सीता क्रिया राम कर्ता । सीता भोग्य राम भोक्ता ।**
**सीता ज्ञान राम ज्ञाता । एकात्मता अतिप्रीती ॥ ८६ ॥**

अशातऱ्हेनं राम आणि सीता यांच्या अलौकिक अनुरागाचं वर्णन केल्यावर संत एकनाथ जो निष्कर्ष काढतात तोहि मोठा मार्मिक आणि आपण सर्वांनी मुद्दाम लक्षात ठेवण्यासारखा आहे. ते म्हणतात —

**जैसी ज्यासी श्रीराम भक्ती । तैसी त्यावरी रामप्रीती ।**
**हे बोलिलेसे बहुता ग्रंथी । मीच किती अनुवादावे ॥ ९३ ॥**

जैसा भाव तैसी प्रीती । जैसी प्रीती तैसी प्राप्ती ।
जैसी प्राप्ती तैसी स्थिती । हाची परमार्थ मुख्यार्थ ।। ९४ ।।
ग्रंथीं राखोनिया गुह्यार्थ । मुख्यत्वे दावावा परमार्थ ।
हाची कवित्वाचा निजस्वार्थ । येणें रघुनाथ संतुष्ट ।। ९५ ।।

हे वाचता वाचता संत रामदासांच्या पुढील उक्तीची आपोआपच आठवण होते —

असे हो जया अंतरी भाव जैसा । वसे हो तया अंतरी देव तैसा ।
अनन्यासि रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।

राम स्वतः मोठा मातृपितृ भक्त होता. गुरूचा आदर करण्यात तो मोठा तत्पर असे. या विषयी अयोध्या कांडातल्या सहाव्या अध्यायात नाथ सांगतात —

गुरुवचन पितृवचन । न करी तो पापी पूर्ण ।
मनुष्य वेषे तो श्वान । काळे वदन तयाचे ।। ११ ।।
गुरुवाक्य विषमवितंड । न करी म्हणे जयाचे तोंड ।
ते तोंड नव्हे रौरव कुंड । पापी प्रचंड तो एक ।। १२ ।।
गुरुवचन अविश्वासी । जिताचि तो नरकवासी ।
प्रेते आतळो भीती त्यासी । महा पापराशी तो एक ।। १३ ।।
यालागी पितृवचन अन्यथा । मी न करी वो सर्वथा ।
त्रिसत्य सत्य हे तत्वता । विकल्प चित्ता धरू नये ।। १४ ।।

श्रीरामाच्या ठिकाणी असे काही गुण होते की तो सर्वांनाच प्रिय होता. सावत्र आई कैकयीनं जरी रामाला वनवासात पाठवायचं ठरविलं होतं तरी कैकयीचा पुत्र भरत याला ही गोष्ट आवडली नाही. तो गादीवर तर बसला नाहीच पण उलट रामदर्शनासाठी तो स्वतःच दंडकारण्यात जायला निघाला. कारण रामावर त्याची फार भक्ती होती. अयोध्या कांडात नाथांनी या विषयी केलेले वर्णन उत्कृष्ट काव्याचा नमुना म्हणून दाखवता येण्यासारखा आहे —

आला ऐकोनी रघुनाथ । सैन्य राहवोनि समस्त ।
रथ सांडोनिया भरत । पायी धावत अनवाणी ।। ८६ ।।
धनालागी जेवी कृपण । दुकाळिया लागी मिष्टान्न ।
देखावया श्रीराम दर्शन । तैसे मन भरताचे ।। ८७ ।।
चकोरा जैसे चंद्रकिरण । जीवनालागी जैसा मीन ।
देखावया रघुनंदन । तैसे मन भरताचे ।। ८८ ।।
चुकलिया निज बाळ । मातेसी भेटीची तळमळ ।
श्रीराम भेटावया तात्काळ । तैसी तळमळ भरतासी ।। ८९ ।।
बहूकाळे आलिया भर्ता । आल्हादे भेटे पतिव्रता ।
तैसे भेटावया रघुनाथा । उल्हास चित्ता भरताचे ।। ९० ।।

वानरा आवडती चणे । गट करोनि गाली भरणे ।
तैसेची निजप्रेम संपूर्ण । भेटे धावोन श्रीरामा ।। ९१ ।।
देखोनिया सोलीव केळे । वानर उडी घाली तात्काळे ।
तैसा आनंद कल्लोळे । सप्रेम मेळे आला भरत ।। ९२ ।।
जीवासवे जैसा प्राण । तैसा भरतासवे शत्रुघ्न ।
भेटावया रघुनंदन । उदित मन दोघांचे ।। ९३ ।।
साखरेसवे जेवी गोडपण । सुमनासवे सुवास संपूर्ण ।
तैसा भरतासवे शत्रुघ्न । रघुनंदन पहावया ।। ९४ ।।
उदकासवे जैसे शीतपण । चंद्रासवे प्रभा पूर्ण ।
तेवी भरतासवे शत्रुघ्न । रघुनंदन पहावया ।। ९५ ।।

श्रीरामानं भरताची समजूत घातली आणि त्याला अयोध्येला परत जाण्याचा सल्ला दिला. तेव्हा रामाच्या खडावा घेऊन भरत अयोध्येला जायला निघाला. अर्थातच 'मी कैकयीस दूषण देणार नाही' असं आश्वासन भरतानं रामाला दिलं. अयोध्याकांडांतील अठराव्या अध्यायातल्या पुढील ओव्या पहा —

राम पादुका आलिया हाता । उल्हास भरताच्या चित्ता ।
पादुका प्रतिष्ठूनी माथा । आल्हादता काय बोले ।।२९।।
श्रीराम पादुका ठेविता माथा । जगी हारपली द्वेष विषमता ।
ते मी कैची आणू आता । निजमाता द्वेषावया ।।३०।।
कैकयी वरदे वन प्रयाण । दूषण नव्हे ते रामा भूषण ।
वाल्मिक वचने कळली खूण । आता कोण द्वेषील ।।३१।।
भरत आणि स्वये शत्रुघ्न । वंदोनी वशिष्ठाचे चरण ।
करोनी श्रीरामासी नमन । काय आपण बोलतू ।।३२।।
तुझ्या पादुका ठेविल्या माथा । तुज भेटल्यावीण रघुनाथा ।
नाही उतरणे सर्वथा । तिन्ही अवस्था त्रिकाळी ।।३३।।
पादुका माझे निजजीवन । पादुका माझे देवतार्चन ।
पादुका माझे निजपूजन । नित्य ध्यान चरणांचे ।।३४।।
तुझ्या पादुका जी श्रीरामा । त्या तव माझा परमात्मा ।
वर्णुनी पादुकांचा महिमा । वंदोनि श्रीरामा निघाला ।।३५।।

संतांना 'नाम' साधनेविषयी फार प्रेम वाटतं म्हणून त्यांनी नामाचा महिमा मोठ्या आत्मीयतेनं वर्णन केला आहे आणि या विषयी जितकं बोलावं तेवढं थोडंच आहे. बालकांड भागातल्या चौदाव्या अध्यायातल्या पुढील ओव्यात नाथांनी नाम सामर्थ्य कसं वर्णन केलं आहे ते पाहा —

श्रीराम हे नामाक्षर । क्षराक्षरातीत पर ।
नाम परब्रह्म परात्पर । नाममंत्र शिवसेव्य ।।५८।।

नामापाशी सद्यःमुक्ती । पंडित बोलती पुराणोक्ती ।
मी बोलिलो ते माझी प्रतीती । नाम निश्चये तारक ॥५९॥

नामे भक्ती नामे मुक्ती । नामापाशी ब्रह्मप्राप्ती ।
रामनाम जे जपती । वंद्य त्रिजगती तेचि पै ॥६०॥

रामनाम परम जप । रामनाम परम तप ।
रामनाम निरसी पुण्यपाप । नाम निर्विकल्प समाधी ॥६१॥

नामी नाही अनध्याय । नामी सर्वदा स्वाध्याय ।
नाम प्रत्यक्ष परब्रह्म । अभाग्या भाव उमजेना ॥६२॥

नामी नाही अनध्ययन । नामी नाही विधीविधान ।
नामी नाही कर्मबंधन । नामे पावन महापापी ॥६३॥

जरी जाला दुराचारी । तो जै भरे अनुतापभरी ।
रामनाम जपे जिव्हारी । तो साधुसंसारी भगवद्वाक्ये ॥६४॥

नाम म्हणजेच परब्रह्म असं संत नुसतंच सांगतात असं नव्हे तर प्रत्यक्ष अनुभव घेऊन सांगतात. संतांच्या तत्त्वज्ञानाला अनुभवाची जोड आहे म्हणूनच 'बोलाचाची भात बोलाचीच कढी जेऊनिया तृप्त कोण झाला ?' अशी गोष्ट या ठिकाणी नाही. संत एकनाथांनी 'नाम' महिमा सर्व ग्रंथातून सांगितला आहे. त्यांची स्वत: नामावर मोठी निष्ठा होती. त्यामुळे नाम म्हणता म्हणता ते स्वत:च राममय झाले होते. युद्धकांडातल्या अठ्ठाविसाव्या अध्यायात नाथांनी नाम महिमा मोठ्या कौशल्यानं गायिला आहे. रामनाम हेच परब्रह्म आहे असं त्यांनी आत्मानुभवानं सांगितलं आहे नाथ म्हणतात —

नामापाशी यश कीर्ती । नामापाशी विजयवृत्ती ।
नामापाशी भक्ती मुक्ती । रामनाम स्मरती ते धन्य ॥७५॥

धन्य श्रीरामाचे चरण । धन्य श्रीरामाचे दर्शन ।
धन्य श्रीरामाचे स्मरण । बंदी मोचन रामनामे ॥७६॥

धन्य श्रीरामाची कीर्ती । धन्य श्रीराम भजन भक्ती ।
धन्य श्रीराम नित्यानुवृत्ती । नाम स्मरती ते धन्य ॥७७॥

नामासी नाही विधीविधान । नामासी नलगे कर्मबंधन ।
नामची दासासी अनुष्ठान । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥७८॥

नामासी नलगे सूतक । नाम भस्म करी पातक ।
नाम सर्वदा नित्य निर्दोष । सरते सुख रामनामे ॥७९॥

नामासी नाही अनाध्यावो । नाम स्मरणी नित्य स्वाध्यावो ।
नाम स्मरती ते सभाग्य पहा हो । नाम स्वयमेव परब्रह्म ॥८०॥

ऐसे बोलता सुग्रीवासी । प्रेम ओसंडले श्रीरामासी ।
आलिंगोनिया हृदयासी । आपणापासी बैसविला ॥८१॥

कोणतंही ज्ञान मिळवायचं असेल तर अगोदर आपला भाव शुद्ध असला पाहिजे. म्हणूनच भाव तसा देव असं म्हणतात. आपला भाव शुद्ध नसेल तर आपल्याला काहीच ज्ञान प्राप्त होऊ शकणार नाही. संतांनी सांगितलेलं ज्ञान आपल्या अंतःकरणात स्थिर होण्यासाठी आपण संतांच्या चरणावर मस्तक ठेवलं पाहिजे. सांगायचा मुद्दा असा की संतवाणीवर आपली अगाध निष्ठा पाहिजे. असं नसेल तर संतवाणी ऐकूनही 'नळी फुंकिली सोनारे इकडुन तिकडे गेले वारे,' अशी आपली अवस्था राहील. यास्तव आपण संतवाणीवर विश्वास ठेवला पाहिजे. कारण या विश्वासाच्या योगानं अगाध ज्ञान सुद्धा हळु हळू अवगत व्हायला मदत होते. म्हणून निष्ठेचं, श्रद्धेचं, भावभक्तीचं, विश्वासाचं मोल खरोखरच अनमोल आहे. एकटया भावाच्या बळावर भगवंत भेटतो हा विचार संत एकनाथ किती तळमळीनं, किती जिव्हाळ्यानं आणि किती भावपूर्ण भाषेत सांगतात ते पाहा. युद्धकांडातल्या ८१ अध्यायातल्या पुढील ओव्या नाथांचं जणुकाही हृद्‌गत सांगणाऱ्याच आहेत —

गुहकाचा भाव पूर्ण । भावे भेटला रघुनंदन ।
भाव तेथे तिष्ठे ज्ञान । विज्ञानेसी जाण सर्वदा ॥१॥

न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे च मृन्मये ।
भावे हि विद्यते देवस्तस्माद्‌भावो हि कारणम् ॥

भावार्थी प्रेम आगळे । भावार्थे तत्व आकळे ।
वैकुंठीचे भाव बळे । सर्वकाळे भेटती ॥२॥

भावावीण व्यर्थ श्रवण । भावावीण व्यर्थ कीर्तन
अर्थावबोध नाही पूर्ण । चित्त वळघे रान विषयाचे ॥३॥

भावार्थावीण व्यर्थ ज्ञान । भावार्थावीण व्यर्थ ध्यान ।
अंतरी विकल्प नांदता पूर्ण । ज्ञान ध्यान लटिकेची ॥४॥

भावार्थावीण वृथा भक्ती । भावार्थावीण वृथा कीर्ती ।
भावार्थावीण विरक्ती । बाह्य मिरविती लटिकीची ॥५॥

भावावीण वृथा विचार । भावावीण वृथा आचार ।
भावावीण कर्माचार । जाण समग्र लटिकाची ॥६॥

**तो भावार्थ मूर्तिमंत । सत्य जाण बंधु भरत ।**
**श्रीरामभेटीसी प्रेमयुक्त । ऋषी समवेत निघाला ॥७॥**

मनुष्यानं आपल्या देहाचा उपयोग ब्रह्मप्राप्तीसाठी करावा असं नाथांचं निक्षून सांगणं आहे. तेच त्यांचं ध्येय होतं. समाजात हरिभक्तीची वेल वाढीस लागावी म्हणूनच संत एकनाथांनीं एवढी ग्रंथसंपदा केली. बालकांड अध्याय अकरा मधील पुढील ओव्या त्या दृष्टीनं फारच मार्मिक आहेत. कारण हें सांगायचं होतं म्हणूनच त्यांनी हातात लेखणी घेतली होती. त्या ओव्या मनापासून वाचा --

**मनुष्य देही ब्रह्मप्राप्ती । तो देहभाव नसावा चित्ती ।**
**विदेहत्वे परमार्थगती । विवेकसद्युक्ती निजपुरुषार्थ ॥६५॥**

**नरदेहा ऐसे गोमटे । शोधिता त्रैलोक्यी न भेटे ।**
**आणि देहां ऐसे वोखटे । अत्यंत खोटे आन नाही ॥६६॥**

**वोखटे म्हणोनि त्यागावे । तरी मोक्षसुखा नागवावे ।**
**गोमटे म्हणोनि भोगावे । तैं अवश्य जावे अधःपाता ॥६७॥**

**हे भोगवे ना त्यागवे । मध्यभोग विभागावे ।**
**भगवन्मार्गी लावावे । तरीच पावावे परमार्थ सुख ॥६८॥**

**ऐके बापा रघुनाथा । या युक्तीच्या पुरुषार्था ।**
**साधूनिया पावावे परमार्था । उपाव अन्यथा असेना ॥६९॥**

तरी प्रभु रामचन्द्राच्या चरणी श्रद्धायुक्त भावनेनं नमन करण्याची इच्छा संत एकनाथांच्या कृपेनं सर्वांच्या मनात निर्माण होवो हीच प्रार्थना !

# मानिनी सीतेचा श्रीरामांना निरोप

( रघुवंश सर्ग १४ वा )

लेखकः—वि. के. छत्रे.

निरोप माझा कळवा नृपाला । साक्षी जरी अग्नि विशुद्धतेला ।
लोकापवादें मज टाकिलें तें । साजे श्रुता कां ? अथवा कुलातें ? ॥ (१)
शिवंकरी वा मति नित्य ज्यांची । प्रेरी न त्या स्वैर कृतीस साची ।
मी पातकें जीं गतजन्मि केलीं । तीं निश्चयें ऐशि फळासि आलीं ॥ (२)
अव्हेरुनी पायिं नत श्रियेला । नेलें मला आपण काननाला ।
मी राज्ञि होतांचि न राहवून । ती मत्सरें दे मज घालवून ॥ (३)
दैत्यां वधाया अपुल्या प्रभावें । मुनि स्त्रियांनीं हि जिला नमावें ।
ती मी कुणा आश्रय याचुं आज । जों आपलें हें तळपे सुतेज ? ॥ (४)
मी दुःसहें त्वद्विरहें स्वजीवा । उपेक्षितें लावुनि बोल दैवा ।
पोटीं जरी हा नसता त्वदंश । करूं न दे जो मज जीवनाश ॥ (५)
ती मी प्रसूताच तपा बसेन । करूनि सूर्यीं स्थिरदृष्टि लीन ।
कीं आपलाची प्रतिजन्मि योग । घडो पतित्वें, न परी वियोग ॥ (६)
वर्णाश्रमांचा प्रतिपाळ राया । कर्तव्य सांगे मनु, ना चुकाया ।
केला जरी त्याग, तपस्वि—नातें । आज्ञापि मत्पालनिं आपणांतें ॥ (७)

श्रीराम चरित्र हें खडीसाखरेच्या खड्याप्रमाणें मधुर आहे. कोणत्याहि बाजूनें जिव्हेनें आस्वाद घेतल्यास सारखेंच गोड. गोड तसेंच आदर्शभूत, मनावर उत्तम संस्कार करणारें. म्हणून अनेक कवींनीं व लेखकांनीं, भारतांतच केवळ नव्हे तर भारता बाहेर परदेशांतही, ह्याच्या मननांत आनंदानें काल घालवून लेखणीहि तें वर्णन करण्यांत झिजविली. मोरोपंतांनीं तर १०८ प्रकारांनीं रामायणाची रचना करून उच्चांक गांठला. आतां लेखास सुरुवात करण्यापूर्वी सीतात्यागाची संक्षिप्त माहिती देणें अवश्य आहे. ती अशी—

रावणाच्या बंदिवासांत राहिलेल्या सीतेचा श्रीरामांनी रावणवधानंतर पत्नी म्हणून पुन्हां स्वीकार केल्याबद्दल एका परिटानें केलेली आपली निंदा गुप्त हेराकडून श्रीरामांना कळतांच, केवळ प्रजेच्या संतोषासाठीं व राजाचें वर्तन आदर्श असावें म्हणून, प्रथमच गरोदर राहून दिवस भरत आलेल्या प्रिय पत्नीचा त्याग करण्याचें कठोर मनानें ठरवून त्यांनी लक्ष्मणास तिला गंगापार करून तेथें सोडून येण्याचा आदेश दिला. त्यानेंहि ती 'आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया' (वडील माणसांची आज्ञा कनिष्ठानें प्रतिप्रश्न न विचारतां मुकाट्यानें पाळावी) या नीतिनियमास अनुसरून मुकाट्यानें अंमलांत आणली.

गुप्तहेर येण्यापूर्वी श्रीरामांनी सीतेस एकांतांत डोहाळे विचारले असतां 'वनवासांत मागें आपण राहिलों तसें कांहीं दिवस ऋषींच्या आश्रमांत रहावेंसें मला वाटतें' असें सीतेनें सांगितलें होतें. त्या मिषानें लक्ष्मण सीतेला रथांत बसवून गंगेकडे निघाला. पण तिच्याशीं एऱ्हवीं मन मोकळेपणानें बोलणारे भाऊजी आज एकाएकीं गंभीर व अबोल भासले. दादांची कठोर आज्ञा वहिनीला कोणत्या शब्दांत व कशी सांगावी या चिंतेंत तो बिचारा लक्ष्मण मग्न होता. इतक्यांत गंगामाईच्या उंच उसळणाऱ्या लहरी त्याच्या दृष्टीस पडल्या. हा सर्वच प्रसंग कविकुलगुरूनें तन्मय होऊन मोठ्या करुणरसवाणीनें वर्णन केला आहे. तो म्हणतो 'त्या लहरीरूपी उभारलेल्या अनेक हस्तानीं गंगामाई जणूं लक्ष्मणाला सांगत होती 'अरे हें असें कठोर व अन्याय्य कर्म तूं करूं नकोस रे ! तुझी वहिनी अत्यंत पवित्र आहे.'

पण त्याला माघारी फिरणें अशक्य होतें. वहिनीला नावेंतून गंगापार करून एका महान् वटवृक्षाखालीं बसून, हात जोडून नेहमींच्या शिस्तीप्रमाणें मान खाली घालून, नेत्रांतून अश्रु गाळीत असतां सद्‌गदित वाणीनें त्यानें दादांची ती कठोर आज्ञा तिला निवेदन केली !

ती आज्ञा वज्राघाताप्रमाणें तिच्या कानावर येतांच ती हतभागिनी मूर्च्छित झाली. लक्ष्मणानें आपलें उत्तरीय गंगेंतून भिजवून आणून तिच्या मुखावर शिंपडलें तेव्हां बऱ्याच प्रयासाने ती सावध झाली. सम्राज्ञी पदावरून क्षणांत आपण अनाथ—निराधार अवस्थेंत येऊन पडल्याची तिला जाणीव होतांच शोकावेग तिला सहन होईना. तथापि त्या मानिनीनें तो शोक विवेकाने आवरून धरला. श्रीरामांना उद्देशून निंदास्पद अक्षरहि न बोलतां ती आपल्या दुर्दैवाचीच निंदा करूं लागली.

वहिनींचा निरोप घेण्यासाठीं लक्ष्मण तिच्या पाया पडला व म्हणाला, 'क्षमा करा वहिनी, येतों मी. येथें जवळच वाल्मीकींचा आश्रम आहे तिकडे आपण जावे. मुनिवर्य आपला सांभाळ निःसंशय करतील. पुन्हा मी आपली क्षमा मागतो.'

'भाऊजी, तुम्हाला क्षमा मागण्याचें कांहींच कारण नाहीं. तुम्ही वडील बंधूचे ताबेदार. ते सांगतील ती आज्ञा निमूटपणें पार पाडावयाची एवढेच तुम्ही पहावयाचें."

"बरें, येतो मी —"

'थांबा, तिन्ही सासूबाईंना अधिकारानुरूप वडिलकीच्या क्रमानें माझे विनम्र प्रणाम सांगा व माझ्या उदरांत असलेल्या त्यांच्या नातवाचें कल्याण असावें म्हणून निरंतर आशीर्वाद द्यावेत अशी मी प्रार्थना केली आहे म्हणून सांगा.'

'वहिनी, याहि पारस्थितींत तुम्हांला कर्तव्याचा विसर पडला नाहीं ! धन्य आहे तुमची. बरें तर, येऊं आतां ?'

'थांबा क्षणभर, त्या अयोध्येच्या राजाला माझा निरोप सांगा.'

'काय ? राजाला ?'

'हो, त्या राजानें माझ्याशीं जडलेलें पतीचें नातें आतां झुगारून दिलें आहे. म्हणून......'

'हो ! खरें आहे तुमचें म्हणणें. सांगा तर निरोप.'

'त्याला म्हणावें माझ्या शुद्धतेबद्दल अग्नीनें प्रत्यक्ष खात्री दिली तरीहि माझा कायमचा त्याग आपण केलांत हें कृत्य गुरूपाशीं शिकलेल्या वेदशास्त्रास अगर कुलाच्या उज्वल नांवलौकिकास साजसे झालें आहे काय ? याचा क्षणभर विचार करा.' क्षणभर सीता थांबली. पण लगेच म्हणाली 'हो, पण चुकलेंच् मी'.

'काय चुकलांत ? तुमचा प्रश्न तर बरोबर आहे.'

'नाहीं, नाथ असलें कृत्य अविचारानें कधीहि करणार नाहींत मीच पूर्वजन्मी कोणते तरी भयंकर पातक केलें असावें. मी पती पासून पत्नीला दूर लोटलें असावें त्याचेंच हें फळ भोगावयास मला आतां लागत असावें. करावें तसें भरावें.'

'वहिनी, आत्मपरीक्षण करण्याची तुमची बुद्धि खरोखरच प्रशंसनीय आहे. संकट कोसळल्यावर माणूस बहुधा त्याचं खापर दुसऱ्याच्या माथीं मारतो.'

'किंवा, भावजो, असंहि घडलं असावं. राजलक्ष्मीनें माझ्यावर सूड उगविला असावा.'

'तो कसा काय ? तुमचा तर्क नाहीं येत माझ्या ध्यानांत.'

'जरा आठवा तो वनांत जाण्याचा प्रसंग. नाथांनीं गळ्यांत माळ घालावयाला पुढें झालेल्या राजलक्ष्मीला झिडकारून मला घेऊन ते वनांत गेले. हा सवतीमत्सर चौदा वर्षे तिच्या मनांत सारखा रात्रंदिवस डांचत होता.'

'हां, आतां आलं लक्षांत माझ्या. तुम्ही परत अयोध्येस येऊन पट्टराणी होऊन तिच्या वरचढ झालांत हें तिला पाहवलें नाहीं.'

'बरोबर ओळखलं तुम्ही आतां—सवतीमत्सर हा.'

'हाय ! जो सवती मत्सर दादांना वनवासांत जावयास कारण झाला तोच आतांहि तुमच्या सारख्या साध्वीच्या त्यागासहि कारण झाला.'

'जाऊ द्या तो विचार. आतां प्राप्तपरिस्थितीचा विचार करावयाचा. मी एक निश्चय केला आहे.'

'कोणता निश्चय केलांत ?'

'उदरांत सूर्यकुलाचें बीज आहे म्हणूनच जगायचें प्रसूतीपर्यंत.'

'नंतर काय करणार आहांत ?'

'तपश्चर्या. भगवान् सूर्यनारायणाकडे—आमच्या मूळ पुरुष असलेल्या देवाकडे—एकाग्र दृष्टि करून.'

'अन् बाळाला कोण सांभाळील ?'

'ज्यानें त्याला जन्माला घातलें असेल तो परमेश्वर.'

'ठीक—पण तप कशासाठीं ?'

'जन्मोजन्मी नाथच मला पति लाभावेत—पण वियोग प्रसंगावाचून—अशी मी प्रार्थना करीत राहीन.'

'धन्य आहे वहिनी तुमची. अपराधावाचून त्याग करणारा पतीच तप करून जन्मोजन्मी मागण्यास सिद्ध झालांत. हाय! अशा असामान्य साध्वी वहिनीच्या सहवासास मी अंतरणार आतां—'

'भगवंताची इच्छा प्रमाण मानावयास हवी मानवानं. असो. आणखी एक शेवटचें पण महत्त्वाचें सांगणें आहे.'

'बोला, पत्नीच्या नात्यानें माझा त्याग केला असला तरी एक सामान्य तपस्विनी—प्रजाजन—या नात्यानें माझ्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांना राजाच्या नात्यानें टाळतां येणार नाहीं. तें त्यांचें मनूनें सांगितलेलें कर्तव्य उरतेंच.'

'शाबास वहिनी, शाबास. कुठें हो इतकें ज्ञान तुम्हांला लाभलें!'

'वडिलांकडून – वडिलांकडे अनेक ऋषिमुनि येत असत. तिथें चर्चा चालत असत धर्मशास्त्राविषयीं. तेंच ज्ञान आज माझ्या उपयोगी अशा रीतीनें पडत आहे.'

'ठीक, सांगतो आपला निरोप.' असें म्हणून लक्ष्मण सीतेला पुन्हा वंदन करून जड अंतःकरणानें परतला.

---

# रामायणातील सुभाषितें

—डॉ. ना. अ. देशपांडे.

वाल्मीकि ऋषि एकदां तमसा नदीवर स्नानाला गेले असता, एका निषादाने काम-विव्हल झालेल्या क्रौञ्च पक्ष्यांच्या जोडीपैकी एकाचा वध केलेला त्यांनी पाहिला. ते अत्यंत व्यथित झाले; व त्यांनी त्या निषादाला शाप दिला—

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।**
**यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ।।**

हा शाप त्यांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे बाहेर पडला तो अशा प्रकारे काव्यरूप घेऊनच. 'भावनांचा उत्स्फूर्त उद्गार म्हणजे काव्य' असे आंग्लकवि वर्डस्वर्थ म्हणतो. वाल्मीकींचे हे श्लोकरूप उद्गार म्हणज अनुष्टुभ् वृत्तातील पहिले काव्य होय. याच संदर्भात कालिदास म्हणतो —

**श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः ।**

या उत्स्फूर्त काव्यमय उद्‌गारामुळे वाल्मीकींना 'आदिकवि' म्हणतात.

या आदिकवींनी सुमारे २४००० श्लोकांत राम-कथा रचिली. ही कथा म्हणजेच रामायण. उत्कृष्ट व्यक्तिचित्रण, निसर्ग, युद्ध इत्यादींचे हुबेहुब वर्णन, करुणादि रसांचे मनाला हेलावून सोडणारे आविष्करण इत्यादींमुळे या काव्याची गोडी जशी वाढली आहे, तशीच ती त्यातील सुभाषितांमुळेही वाढली आहे. रामायणात सुमारे ५५०–६०० सुभाषिते आहेत. यांपैकी काही पुढे दिली आहेत. त्यांवरून वाल्मीकि ऋषींचे मानवी जीवनाचे ज्ञान किती सखोल होते याची कल्पना येईल.

खर राक्षस आपणावर हल्ला करण्यास येत आहे हे पाहून सीतेला गुहेत घेऊन जाण्यास रामाने लक्ष्मणाला सांगितले. त्या वेळी राम म्हणतो : "संकट येणार अशी शंका आली की आपले शुभ व्हावे अशी इच्छा करणाऱ्या शहाण्या माणसाने त्याचा प्रतिकार करण्याची तयारी ठेवावी."

**अनागतविधानं तु कर्तव्यं शुभमिच्छता ।**
**आपदा शङ्कमानेन पुरुषेण विपश्चिता ॥** (३.२४.११)

अशोक वनात प्रवेश केल्यावर सीता न दिसल्यामुळे हनुमान नाराज होतो. आपण एवढा सागर पार करून आलो; तसेच परत गेलो तर सुग्रीव वगैरे काय म्हणतील, या विचाराने तो खिन्न होतो. पण नंतर मनाशी असा विचार करतो : "ज्या ठिकाणीं आपण आतापर्यंत सीतेचा शोध केला नाही ती ठिकाणे पाहू; कारण कामाचा कंटाळा न करणे हेच भरभराटीचे मूळ आहे: त्यामुळे फार मोठे सुख मिळते."

**अनिर्वेदः श्रियो मूलमनिर्वेदः परं सुखम् ।** (५.१२.१०)

सीता–विरहाने व्याकुळ झालेला राम लक्ष्मणाला सांगतो : "ह्या काम-विकाराची गति कशी कुटिल आहे पहा ! माझी चांगली, व त्यापेक्षाही अधिक चांगले बोलणारी सीता गेली, व ती परत प्राप्त होण कठिण आहे, हे माहीत असूनसुद्धा काम-विकारामुळे मला तिची आठवण होत आहे."

**अहो कामस्य वामत्वं यो गतामपि दुर्लभाम् ।**
**स्मारयिष्यति कल्याणीं कल्याणतरवादिनीम् ॥** (४.१.६८)

जटायूच्या मरणाच्या वेळी राम लक्ष्मणाजवळ असे उद्‌गार काढतो : "काळावर मात करणे कोणालाही शक्य नाही."

**कालो हि दुरतिक्रमः ।** (३.६८.२१)

सीताशोधासाठी मदत करण्याचे वचन देऊनही सुग्रीव स्वस्थ बसलेला पाहून त्याला भेटण्यासाठी रामाच्या आज्ञेने लक्ष्मण त्याच्याकडे जात असता तारा त्याला म्हणते : "सुग्रीवाच्या अपराधाची क्षमा कर. स्वतःच्या माणसावर कधी राग धरावयाचा नसतो."

**न चापि कोपः स्वजने विधेयः ।** (४.३३.५१)

लंकादहनानंतर हनुमानाला वाईट वाटून आपण हे चांगले कृत्य केले नाही अशी तो स्वतःची निर्भर्त्सना करू लागतो. आपण क्रोधाविष्ट होणे योग्य नव्हते, क्षमाशील असावयास पाहिजे होते, असा विचार करीत असताना तो स्वतःशी म्हणतो : "साप जसा जुनी झालेली कात टाकतो, त्याप्रमाणे उत्पन्न झालेला राग क्षमा करून जो घालवितो, त्यालाच खरोखर पुरुष म्हटले पाहिजे."

**यः समुत्पतितं क्रोधं क्षमयैव निरस्यति ।**
**यथोरगस्त्वचं जीर्णां स वै पुरुष उच्यते ॥** (५.५५.६)

राम वनात जाणार या दुःखद वार्तेने खिन्न झालेल्या कौसल्या मातेचे सांत्वन करताना लक्ष्मण दशरथाला दोष देतो. वडील माणसे वाममार्गाने वागू लागली की त्यांना शिक्षा केलीच पाहिजे असे आपले मत सांगताना तो म्हणतो : "गर्विष्ठ, काय करावे व काय करू नये याचा विचार न करणाऱ्या, भलत्याच मार्गाने जाणाऱ्या वडील माणसालासुद्धा शिक्षा देणे योग्यच आहे."

**गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।**
**उत्पथं प्रतिपन्नस्य कार्यं भवति शासनम् ॥** (२.२१.१३)

रामानेच राज्यपद स्वीकारावे या आपल्या मताच्या पुष्टयर्थ जाबालि रामाला सांगतो की, या जगात कोणी कोणाचा नाही. जीव एकटाच जन्माला येतो व एकटाच निघून जातो.

**एको हि जायते जन्तुरेक एव विनश्यति ।** (२.१०८.३)

बिभीषण रावणाचा त्याग करून रामाला येऊन मिळाला. युद्धात त्याची व इंद्रजिताची गाठ पडल्यावर इंद्रजिताने त्याचा धिक्कार केला. तेव्हा बिभीषण त्याला म्हणतो : "मी तुमच्या कुळात जन्माला आलो तरी मी सत्त्वगुणी असल्यामुळे दुष्ट कृत्ये करणाऱ्या तुमचा त्याग केला आहे. परद्रव्याचे अपहरण करणे, परस्त्रीवर हात टाकणे व मित्रांविषयी अतिशय अविश्वास धरणे हे तीन दोष नाशाला कारणीभूत होतात. हे दोष रावणाचे ठिकाणी आहेत, म्हणून मी त्याचा त्याग केला."

**परस्वानां च हरणं परदाराभिमर्शनम् ।**
**सुहृदामतिशङ्का च त्रयो दोषाः भयावहाः ॥** (६.८७.२३)

रामाला सांगण्यासाठी सीता हनुमानाजवळ निरोप देते : "तुमच्यासारखा नाथ असून मी अनाथ झाले आहे. दया हा श्रेष्ठ धर्म आहे असे आपणच मला सांगितले होते. मग माझ्यावर दया करून मला का मुक्त करीत नाही ?"

**आनृशंस्यं परो धर्मः ।** (५.३८.३९)

अगस्त्य ऋषि रामाला रावणादिकांची उत्पत्ति इ. सांगताना वैश्रवणा (कुबेरा) विषयी म्हणतात : "हा वैश्रवण सद्वर्तनी होता. त्याने विचार केला : 'मी अत्यंत धर्मनिष्ठ राहीन; कारण धर्म हीच सर्वश्रेष्ठ गति आहे.' "

**धर्मो हि परमा गतिः।** (७.३.१०)

रामाच्या आज्ञेने सीतेला वाल्मीकी ऋषींच्या आश्रमाजवळ सोडून खिन्न मनाने लक्ष्मण परत आला, व "सीतेला आपल्या आज्ञेप्रमाणे वाल्मीकि ऋषींच्या आश्रमाजवळ सोडून आलो" असे त्याने रामाला सांगितले. रामाचा अनावर दुःखावेग पाहून त्याने रामाला म्हटले : "जगातील सर्व वस्तु क्षणभंगुर आहेत; म्हणन पुत्र, पत्नी, मित्र, धन यांच्याविषयी अति आसक्ति दाखवू नये ; कारण त्यांचा विरह होणार हे निश्चित."

**तस्मात्पुत्रेषु दारेषु मित्रेषु च धनेषु च।**
**नातिप्रसङ्गः कर्तव्यः विप्रयोगो हि तैर्ध्रुवम्॥** (७.५२.१२)

सीतेचे अपहरण करणे युक्त नाही असे रावणाला सांगताना मारीच म्हणतो: "परस्त्रीवर हात टाकणे यापेक्षा मोठे पाप नाही."

**परदाराभिमर्शात्तु नान्यत्पापतरं महत्।** (३.३८.३०)

---

# श्रीगोंदवलेकर महाराज

(व्यक्तिदर्शन)

लेखक – पु. मु. अत्रे.

('व्यक्तिदर्शनां' तील कांहीं विशेष भाग रामनवमीच्या निमित्तानें मुद्दाम आधीं या अंकांत देण्यांत येत आहे. महाराजांची रामभक्ति कशी सायुज्यतेच्या पराकोटीला जाऊन पोचली होती हें यावरून स्पष्ट होईल. भक्तींत देव आणि भक्त कसे एकरूप होऊन जातात हेंही या प्रसंगांवरून दिसून येईल. — संपादक.)

**श्रीराममंदिराची स्थापना :**

पंढरपूरचा रस्ता गोंदवल्यावरून आहे. यात्रा किंवा वारीला जाणारी मंडळी गोंदवल्यास भिक्षा व पाणी यांची चांगली सोयअसल्यामुळें येथें एक टप्पा करून पुढें निघत. मारुतीचें मंदिर ही एकच जागा त्यांना उतरण्यास होती. आतां श्रीमहाराज स्थायिक झाल्यापासून बायका मुलांना घेऊन पुष्कळ प्रापंचिक, साधु, वारकरी वगैरे येऊं लागले. यांत श्रीमहाराजांचें दर्शन व पांडुरंगाची यात्रा असा दुहेरी लाभ होत असे. सर्वांचा परामर्श श्रीमहाराज घेत. पण अडचण पडूं लागली निवाऱ्याची. शिवाय कांहीं कुटुंबें संतसेवेसाठीं रहाण्यासच येऊं लागलीं. त्यांना उपासनेकरितां

देवाचें सगुणरूप हवेंच. म्हणून श्रीमहाराजांनीं एक प्रशस्त मंदिर बांधण्याचा संकल्प केला. अगदीं गर्भांतील संस्कारापासून त्यांचा श्रीरामरायावर दिव्य अनुराग होता. सहाजिक आपल्या घराच्या समोरच श्रीराममंदिर बांधण्यास त्यांनीं सुरुवात केली. कामावर गांवातलेच लोक निवडले. नकाशा स्वतःच तयार केला. खर्चास लागणारें द्रव्य मुळींच नव्हतें आणि याचना तर करायची नाहीं हा बाणा ! परंतु दर्शनाला यणारे श्रीमहाराजांना जें अर्पण करीत त्यावर जेमतेम खर्च निभावे. एका आठवड्यास मात्र पंचाईत झाली. तेव्हां महाराजांनी असा उपाय सुचविला कीं "आज मुलां-माणसांसकट कामगारांनी इथेंच भाकरी खावी व काम बंद ठेऊन नामस्मरण करीत बसावें. पाहूं राम काय करतो तें !" तिसऱ्या प्रहरीं म्हसवडचे बापूसाहेब माने दर्शनाला आले. त्यांनीं उसाची लागवड करतांनाच संकल्प केला होता कीं फायद्यांतून ५ टक्के श्रीमहाराजांना अर्पण करावयाचे. त्याप्रमाणें त्यांत एक वाढता करून त्यांनीं १०१ रुपये त्यांच्या चरणावर वाहिले व प्रसाद घेऊन गेले. नंतर श्रीमहाराजांनीं पगार करून उरलेले रुपये मालासाठीं मुकादमाच्या स्वाधीन केले. "रामरायानें लाज राखली. पण मंदिर जर त्याचेंच आहे तर तें होण्याची काळजी त्यालाच ! आपण कशाला उगीच तळमळावें ?" श्रीमहाराज म्हणाले. 'मी केलें' या शब्दांनी देखील महाराजांनी आपली जीभ विटाळली नाहीं. आतां मंदिराचें काम उत्तम आकार घेऊं लागलें--पण मूर्तीची तजवीज काय ? श्रीमहाराज म्हणत "मंदिराचा कळस चढला कीं राम आपणहून येईल बघा !"

## रघुनंदन आले आले !

इकडे तडवळास तेथील श्रीमंत पण भाविक कुळकर्ण्यानें असें योजिलें कीं स्वतः राहण्यासाठीं एक मोठा वाडा व श्रीरामाचें मंदिर बांधावें. त्यानीं प्रथम वाडा बांधला व कुशल शिल्पकारानें घडविलेल्या श्रीराम-लक्ष्मण-सीतेच्या संगमरवरी मूर्ति आणून घरांत ठेवल्या. मग त्यांनी मंदिराचें काम हातीं घेतलें. दुर्दैवानें त्यांच्या वाड्याला आग लागून वाडा भस्म झाला. सुदैवानें मूर्ति अभंग राहिल्या, पण त्यांना जळके डाग पडले. थोड्या दिवसांनीं त्या कुळकर्ण्याला लागोपाठ तीन पहाटे स्वप्नें पडलीं. स्वप्नांत ती रामाची मूर्ति सांगे, "मला तूं गोंदवल्यास ब्रह्मचैतन्यांच्याकडे ने. येथें किती दिवस असें ठेवणार आहेस ?" तेव्हां त्याला माहीत झालें कीं, श्रीमहाराजही राममंदिर बांधीत आहेत. म्हणून तो त्या मूर्ति बैलगाडींतून जपून गोंदवल्यास आणूं लागला. त्या रविवारच्या दिवशीं श्रीमहाराज सकाळींच बोलूं लागले, "मला असें वाटतें कीं आज कोणीतरी मोठें माणूस आपल्या घरीं येणार आहे, म्हणून आज आपण उपवास, भजन व नामस्मरण करूं या." स्नानें झाल्यावर त्यांनी कामगारांसकट सगळ्यांना पोटभर फराळ स्वत वाढला व आपण फक्त नैवेद्याचें दूध घेऊन दुपारीं एक वाजतां भजनाला प्रारंभ केला. दोन तास तल्लीन भजन झाल्यावर दोघांजणांना

श्रीमहाराजांनीं रस्त्यावर बसण्यास सांगून 'कोणी आलें तर त्यांना घेऊन या' असें म्हटलें. चारच्या सुमारास दोन बैलगाड्या येतांना दिसल्या आणि असें कळलें कीं तडवळचे कुळकर्णी स्वतः श्रीमहाराजांना मूर्ति देण्यासाठीं आले आहेत. तेव्हां 'जय जय श्रीराम' असा भजनाचा गदारोळ करीत श्रीमहाराज मंडळीसह श्रीरामरायाला सामोरे गेले व पंचारती ओवाळून त्यांनीं मूर्ति घरीं आणल्या. दुसऱ्या दिवशीं उपोषणाचें पारणें करून कुळकर्ण्यांचा उत्तम सत्कार केला व वेशीपर्यंत येऊन निरोप दिला. पुढें एका उत्तम कारागिराकडून मूर्तींना उजळा दिला.

सन १८९१ त मंदिरावर कळस चढला. बापूसाहेब माने यांनीं सिंहासन बांधविलें. श्रीमहाराजांनी स्वहस्तानें प्राणप्रतिष्ठेच्या कुंकुमपत्रिका गांवोगांवीं रवाना केल्या. अगोदर त्यांनीं देवापुढें प्रस्थानाचा नारळ ठेऊन अखंड रामनाम, भजन, कीर्तन, पुराण व मुक्तद्वार भोजनाचा सप्ताह केला. आठ दिवस गोंदवल्यांत एकही चूल पेटली नाहीं. समारंभास काशी ते रामेश्वरापर्यंतचे चतुर्वैदिक, पंडित, हरिदास, गवयी, शिष्य व अंतरंगांतील मंडळी हजारोंनीं आली. गोंदवल्यास हरिहराचा दंग चालला ! अनेकांनीं आपल्या घरची पवित्र तीर्थाची घागर लाख लावून आणली होती. प्रत्येकाला श्रीमहाराज जास्तींत जास्त वेळ आपल्या जवळ हवे होते आणि तेही प्रत्येकाशीं अतीव प्रेमळपणें बोलून भगवंताच्या प्राप्तीकडे त्याचें लक्ष लावीत हालचाल करीत होते.

## प्रतिष्ठापना

श्रीमहाराज पिंडानेंच सुखरूप आणि स्थापनेच्या दिवशीं केशरी त्रिपुंड्र, तुळशीची नवीन माळ, कोऱ्या खडावा, जरीची काषाय कफनी अशा थाटांत होते. सिंहासनारूढ श्रीरामाला डोळे भरून पाहण्यासाठीं ते आपल्या मातेला बोलावण्यास गेले. त्यावेळीं त्यांच्या तेजाची आभा अष्टदिशांत पसरली व आनंद ओसंडून वाहूं लागला. त्यांच्या आनंदमय मनोहर मूर्तीकडे मातेचे नेत्र लागतांच वात्सल्य डोळ्यांतून सरसरून भूमीवर पडलें. त्या चटकन् उठल्या. त्यांनी मुलावरून फुलांची दृष्ट काढली व त्याचा हात धरून श्रीरामाच्या मूर्ति डोळे भरून पाहून आल्या. सूर्योदयाबरोबर मंजुळ वाद्यांनीं वातावरण धुंद झालें असतांनाच वेदमूर्तींनीं दंपतीस संकल्प सांगितला व क्रमानें प्राणप्रतिष्ठाविधि यथासांग पार पडला. राज्याभिषेकाचा पोषाख श्रीरामरायाला घातला होता. रेशमी वस्त्र, जरीचें उपरणें, एक होन दक्षिणा व श्रीफल असें आमंत्रितांना, खणानारळाच्या ओटचा सुवासिनींना आणि धोतर, फेटा व पांच रुपये प्रत्येक कामगाराला अशी संभावना केली. त्या दिवशीं दहा हजार मंडळी पक्वान्नाच्या भोजनानें तृप्त झाली. रात्रीं ९ वाजतां श्रीमहाराज रामरायासमोर कीर्तनाला उभे राहिले. "**छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायबाप** ॥" या अभंगानें सुरवात झाली. रामनामानें वातावरण सबंध दिवसभर भरलेलेंच होतें आणि रात्रीं या प्रेमळ अभंगानें श्रीमहाराजांची अमृतवाणी स्रवूं आगली. तीन तास

प्रत्येकजण श्रीराममूर्तीत तन्मय झाला होता. महाराजांनीं श्रीरामरायाच्या मुखाकडे प्रेमांत न्हाऊन पाहिलें व डबडबलेल्या नेत्रांनीं, "**श्रीरामचंद्रा करुणासमुद्रा । ध्यातों तुझी राजस योगमुद्रा ॥**" हे दोनच आत्मनिवेदनाचे चरण म्हटले तोंच त्यांच्या ओंजळींत श्रीरामरायाच्या गळ्यांतील टवटवीत गुलाबाचा हार पडला! श्रीमहाराजांनीं तसाच साष्टांग नमस्कार घातला व त्या फुलांचा प्रसाद श्रोत्यांना दिला.

## श्रीरामरायाचा अश्रुपातः

सन १८९७ चा रामनवमीचा उत्सव संपला. नुकताच दुष्काळही हटला होता. त्यामुळें पुष्कळ मंडळी गोंदवल्यास राहिली होती. एका सकाळीं श्रीमहाराज भजनाला उभे राहिले. मंदिर गच्च भरलें म्हणून ते भजनांत निरूपणही करूं लागले व त्यांत शेवटीं हा अभंग घोळून म्हणू लागले—

**त्रेपन्न वर्षे भूमिभार । आतां पाहूं आपलें घर ॥**
**देहमर्यादा सरली । मागें भक्ति करा भली ॥**
**तुम्हां सांगितल्या खुणा । विसरूं देऊं नका मना ॥**
**दीन दास आनंदला । राम बोलावितो मला ॥**

श्रोते भजनांत स्वतःला विसरले, पण हा अभंग कानांवर पडतांक्षणीं ते एकदम दचकले व अत्यंत घाबरले. श्रीमहाराजांनीं "जानकी-जीवनस्मरण जय जय राम" असा घोष करून भजन समाप्त केलें व म्हटलें, "मी नैमिषारण्यांत जातों. कोणीहि रामाला विसरूं नये व नामस्मरण करीत आनंदांत काल घालवावा." श्रोत्यांचीं मनें सुन्न झालीं. मोठा धोंडा पडून छाती दडपलीसें वाटलें व परिणामीं सर्व जण आक्रोश करूं लागले ! कांहींनीं श्रीमहाराजांचे पाय घट्ट धरले ! पण त्यांचा निश्चय रेसभरही ढळला नाहीं म्हणून सर्वांनीं त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलें आणि आशीर्वाद घेतले. श्रीमहाराज रामरायाच्या पायां पडण्यास आले. रामाकडे नितांत प्रेमानें टक लावून पहात म्हणाले, "रामा, आजवर तुझ्या छायेंत मी वावरलों. तुझ्या संगतींत अपार आनंदांत दिवस गेले. आतां मला निरोप दे." अन् तसेच ते मंदिराबाहेर टांग्यांत बसण्यास आले. पुन्हां सर्वांनीं त्यांना नमस्कार केला. कोणाच्या तोंडातून शब्दच निघेनासा झाला. गोंदवल्याचा प्राण निघून जात होता ! ! टांगा चालू झाला. सर्व लोक भरल्या डोळ्यांनीं त्यांच्या मूर्तीकडे स्तब्ध पहात होते. इतक्यांत एक जण हात वर करून टांग्याच्या मागून धांवत येतांना श्रीमहाराजांनीं पाहिला म्हणून टांगा थांबविला. तो घाबऱ्या घाबऱ्या धापा टाकीत म्हणाला, "महाराज, देवाच्या नेत्रांतून अश्रु पडत आहेत." श्रीमहाराज उद्गारले, "खरंच ?" लगेच टांगा वळवला. श्री महाराज हात-पाय धुवून सोवळें नेसले व रामाजवळ आले. मूर्तीच्या डोळ्यांतून पाण्याची धार लागलेली त्यांना दिसली. चटकन् त्यांनीं मऊ रुमालानें टिपलें तरी पाण्याची धार थांबेचना ! मग मात्र श्रीमहाराजांच्या डोळ्यांना चटकन् पाणी आलें

व ते रामरायाला म्हणाले, "रामा मी चाललों म्हणून तूं रडतोस होय? अरे, मी जाऊं नये अशी तुझी इच्छा असेल तर मला तरी जाऊन काय करायचें आहे? हा बघ मी राहिलों. आतां रडणें आवर बघूं!" त्याक्षणींच मूर्तीच्या डोळ्यांचें पाणी थांबलें! आनंदी आनंद झाला!! श्रीमहाराज मंडळींना म्हणाले, "चला, चला! रामाला नैवेद्य करा आणि झालेला प्रकार या कानाचा त्या कानावर जाऊं देऊं नका." दुसऱ्या दिवशीं महाराजांनी तिन्ही मूर्तींना दुधाचा अभिषक केला व अन्नदान केलें. तिसऱ्या दिवशीं एकादशीला श्रीमहाराज भजनांत इतके रंगून गेले कीं ते नाचत नाचत रामरायाच्या समीप आले आणि आश्चर्य असें कीं रामरायाच्या मंदिलांत खोवलेला कलगी भव्य तुरा उडून श्रीमहाराजांच्या अंगावर पडला. मंडळींना त्यांची धन्य धन्य वाटली. आरती झाल्यावर श्रीमहाराज म्हणाले, "चैतन्य सर्वत्र भरलेलें आहे. तें कोठेंही प्रकट होऊं शकतें. ज्याची भावना मूर्तींत चित्‌चैतन्यरूप असते त्याला दगडांतूनही देव प्रकट होतो. मात्र एकमेव भावना पाहिजे!"

## सगळा भार रामावरच

काशींत एक दिवस श्रीमहाराजांनीं शंभर शास्त्री-पंडितांना प्रसादाचें आमंत्रण केलें. संभावनेप्रीत्यर्थ एक वस्त्र देण्याचा संकल्पही केला. एकंदर एकशें पंचाण्णव रुपयांचा आकडा झाला, आणि कफनीच्या खिशांत पहातात तों एकही पैसा नव्हता. आतां काय करायचें? म्हणून त्यांनीं मंडळीजवळ उसने पैसे मागितले ते एकशें ऐंशीं रुपये झाले. लगेच आठवल्यासारखें करून त्यांनीं हरिपंतांना गादीखालीं पहाण्यास सांगितलें. त्यांना तिथें दोनशें रुपये मिळाले व ते त्यांनी श्रीमहाराजांच्या हातावर ठेवले. तेव्हां ते उद्‌गारले, "रामाची माझ्यावर कृपा आहे. नाहींतर आज केवढी फजीतीची वेळ आली होती! आपण तरी कशाला घाबरायचें? ज्याच्या नांवानें संकल्प केला त्याच्याच इच्छेनें तो पार पडेल किंवा नाहीं! आपण कोण आहोंत?" सगळ्यांचे पैसे तसेच परत दिले व यथासांग कार्य झालें. प्रेमानें अन्नदान व निष्ठेनें नाम यापेक्षां कशांतही त्यांना महत्व वाटत नसे.

## रामाचा अश्रुपातः

सन १९०९ सालीं गोंदवल्याच्या पंचक्रोशींत प्लेगाची साथ जोरांत होती. खुद्द गोंदवल्यांत अजून लागण नव्हती. पण एका संध्याकाळीं श्रीमहाराजांनाच सपाटून ताप भरला व गळ्याच्या दोन्ही बाजूला गांठी येऊन गळा सुजला. श्रीमहाराज पट्टा गुंडाळून व दुलई पांघरून खोलींत पलंगावर पडले होते.

मंदिरांत नामसप्ताह चालू असून 'रघुपति राघव राजाराम पतीतपावन सीताराम' चा घोष एकटाळींत चालला होता. मध्येंच गणपतराव दामल्यांनी रामाकडे पाहिलें तों त्यांना एकदम धस्स् झालें कारण मूर्तीच्या डोळ्यांतून टप्‌टप् अश्रु गळत होते.

ल्यांच त्यांनीं श्रीमहाराजांना सांगितलें. 'जानकीजीवनस्मरण जय जय राम' म्हणत ते उठले, सोवळ्याची लंगोटी नेसले व चौरंगावर चढून रेशमी रुमालानें रामाचे अश्रु पुशीत प्रेमानें म्हणाले, "रामराया, मला ताप आला म्हणून कां तुला वाईट वाटत आहे? मला बरें वाटेल रे!" तरी सुमारें अर्धा तास अश्रु गळत होते. ते थांबल्यावर रामाचा भिजलेला पोशाख महाराजांनी बदलला व मंडळींना म्हटलें, "हें कोणाला बाहेर सांगूं नका. उद्यां रामाला दुधाचा अभिषेक करा." पण ही बातमी 'केसरी' पर्यंत पुण्याला गेली व त्या आठवड्यांत याबद्दल स्फुटही छापून आलें. "रामाची मूर्ति आम्हीही पुष्कळदां पाहिली आहे. तीच आज येथें आहे. पण मूर्तीच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रु आम्ही कधीं पाहिले नाहींत. देव आणि भक्त एक झाल्याशिवया पाषाणाच्या मूर्तीस आलेला कळवळा इतरांच्या प्रचीतीस येणार नाहीं" असा स्फुटाचा सारांश होता. पुढें श्रीमहाराज खडखडीत बरे होऊन रिवाजाप्रमाणें थाटांत पारणें झालें.

पारण्याच्या रात्रीं श्रीमहाराजांचें कीर्तन झालें. ते इतके रंगले होते कीं नाचत नाचत मारुतिरायापासून रामरायापर्यंत पदन्यास करीत होते. शेवटीं ते मूर्तीजवळ येतांच रामरायाच्या हातांतला बाण श्रीमहाराजांच्या पायजवळ येऊन पडला. तो त्यांनीं उचलून मस्तकार टेकवला व म्हटलें, "चार दिवस स्वारीच्या हातांत बाण देऊं नका."

## हुबळीला रामस्थापना :

हुबळीला श्रीमहाराजांचे पुष्कळ शिष्य होते. दत्तोपंत तबीब सावकार यांनीं इतरांच्या सहकारानें एक राममंदिर बांधलें व मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यास श्रीमहाराजांना विनंती केली. पुष्कळ मंडळी घेऊन ते हुबळीला गेले. प्रतिष्ठापनेच्या आदल्या रात्रीं श्रीमहाराजांना ताप आला होता. तथापि सकाळपासून कार्यक्रम यथास्थित चालले होते. मंडळी मंदिराकडे समारंभाने निघाली. पण श्रीमहाराज मध्येंच कोणाला न कळत आडव्या बोळांत गेले व जानकीबाईच्या घराशीं थांबले. ह्या बाई भाऊसाहेब केतकरांकडे गदगला स्वयंपाक करीत असत. त्यांना ना नातलग ना लोभ, पण श्रीमहाराजांवर निष्ठा अपार! श्रीमहाराजांसारखा ऐश्वर्यमान् राजयोगी बोळींत दत्त म्हणून आल्यावर या मूर्तिमंत दारिद्र्यांतील ७५ वर्षाच्या समाधानी बुढेस नमस्काराचें का आसन देण्याचेंही भान राहिलें नाहीं. एका फाटक्या सतरंजीवर बसत श्रीमहाराज म्हणाले, "जानकीबाई, मला कालपासून ताप येतो आहे व चव नाहीं. आतां भूक वाटते आहे म्हणून तुम्ही बुटुकुलेंभर मऊभात व सार मला वाढा." जानकीबाई भानावर येऊन त्यांनीं आपलें अंथरूण पसरलें व श्रीमहाराजांना निजवलें आणि सार-भात करून स्वतः त्यांना भरवला. ते आंचवले तेव्हां कुठे तिला नमस्कार करण्याचें सुचलें. चरणकमलांवर मस्तक ठेवतांच दोघांच्याहीं डोळ्यांतून टिपें गळूं

लागलीं. श्रीमहाराज म्हणाले, "माय, तुमची जबाबदारी माझ्याकडे आहे. तुम्ही होईल तेवढें नाम घ्या. राम आपलें प्रेम खास देईल. शांत आनंदांत रहा."

रामाची स्थापना यथाविधि समारंभानें पार पडली. कधीं झालें नव्हतें असें अन्नदान हुबळींत झालें. नंतर सिद्धारूढ स्वामी यांच्या पाचारणावरून श्रीमहाराज मंडळींना घेऊन मठांत गेले. स्वामी सामोरे होऊन त्यांनीं श्रीमहाराजांना आलिंगन दिलें. आपल्या शिष्यांना चार शद्ब सांगावेत अशी त्यांनीं विनंती केली असतां महाराज म्हणाले, "आपल्यासारख्या दिव्य विभूतीपुढें व आपल्या थोर अधिकारी शिष्यांना मी तो काय सांगणार ? आपल्या दर्शनानें मला जो निर्भर आनंद झाला आहे त्या तऱ्हेनेंच आपल्या शिष्यांनीं असावें असें मला वाटतें." तरी स्वामींची अवज्ञा होऊ नये म्हणून ते म्हणाले : "तुम्हां सर्वांचें भाग्य खरोखरच अपूर्व म्हणूनच तुम्हांला स्वामींचा सहवास लाभला आहे. त्यांच्या शद्वाशद्वावर एकमेव निष्ठा ठेऊन प्रपंचात रहाल तर आणखी कोणतीहि साधना करण्याची जरूरी नाहीं. भगवंताचें अखंड नाम-स्मरण करावें हीच स्वामींची आज्ञा आहे. या आज्ञेचें अणुमात्र उल्लंघन तुम्ही केलें नाहीं तर स्वामी तुम्हांला हाताला धरून भगवंतापर्यंत पोंचवतील याची मी ग्वाही देतों." श्रीमहाराजांचें बोलणें ऐकून स्वामी उद्गारले, "साधु, साधु ! वा, वा, फारच छान !" आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा निघूं लागल्या. आपला मठ व आपली बांधून ठेवलेली समाधी स्वामींनीं श्रीमहाराजांना दाखविल्यावर त्यांनीं एकमेकांस आलिंगन दिलें व नंतर महाराज घरीं परतले.

## कऱ्हाडला रामस्थापना :

रामभक्त वासुनाना देव व चिवटे यांच्या विनंतीवरून महाराज सन १९११ मध्यें कऱ्हाडला रामस्थापनेस गेले. स्थापना थाटांत यथासांग झाली. गरिबांना अन्नदानही चांगलें झालें. संकेश्वरमठाधीश श्रीमच्छंकाराचार्य यांचें वास्तव्य तेथें होतें. श्रीमहा-राजांनीं श्रींनां विनंती केली कीं, "उदईक रामाच्या प्रसादास परिवारासह श्रींनी मंदिरांत भिक्षा करावी." श्री म्हणाले, "अहो, मठाचा परिवार फार मोठा आहे. घोडे देखील आहेत ! तेव्हां मी एकटाच येईन." श्रीमहाराज म्हणाले, "स्वामींनी मुळीच संकोच करूं नये. सर्व परिवार आणावा. रामाच्या कृपेनें सर्व ठीक होईल." दुसरे दिवशीं स्वामी शिष्यपरिवारासह आले. थोड्या वेळानें भोजनास सुरवात झाली. श्रीमहाराज स्वामींच्या समोर होते. त्यांनीं विचारलें, "श्रीसंस्थानांत काय कमी आहे ?" स्वामी म्हणाले, "सर्व अनुकूल आहे. फक्त हत्ती तेवढा नाहीं." तेथल्या तेथें श्रीमहाराजांनीं हत्ती अर्पण करण्याचा संकल्प केला ! स्वामी सद्गदित होऊन म्हणाले, "दान देणारे पुष्कळ आहेत, पण गजदान देणारे तुम्ही एकमेव आहांत. धन्य आहे तुमची !" श्रीमहाराज म्हणाले, "स्वामींनीं तज्ञांना ऐरावत कुलांतील हत्ती शोधण्यास सांगावें व मला आज्ञापत्रानें त्याचें मोल कळवावें. रक्कम माझ्या

माणसाबरोबर पाठवीन." भोजनोत्तर उपचार केल्यावर श्रीमहाराज म्हणाले, "हत्तीचा शोध तर व्हावाच. पण आत्तां एक कालवड मी मठाला अर्पितों तिचा स्वीकार व्हावा." स्वामींनीं प्रेमानें स्वीकार केला. एक वर्षानें स्वामींनी कळविलें कीं, 'हत्ती मिळत नाहीं.' तेव्हां श्रीमहाराजांनी मठाला हत्तीच्या मोलाचें सुवर्ण दान केलें.

## वलव्हणकर व श्रीमहाराज यांचा वाद–संवाद : रूप श्रेष्ठ कीं नाम श्रेष्ठ

तुकारामबुवा वलव्हणकर नांवाचे मठपति पंढरपूरला येत असत. ते नामापेक्षां भगवंताचे स्वरूपच मनुष्याला श्रेयस्कर आहे हें तर्क व शास्त्रांचे आधार देऊन सांगत. एकदां त्यांनी श्रीमहाराजांना निरोप पाठविला कीं, "रूपापेक्षां नाम कसें श्रेष्ठ आहे तें सिद्ध करा." श्रीमहाराजांनीं कळविलें कीं, "आपणच राममंदिरांत यावें." वलव्हणकरांनीं मान्य केलें. दुसऱ्या दिवशीं बुवा, त्यांचे शिष्य व पंढरपुरांतील नामांकित शास्त्री–पंडित मिळून सर्व जण मंदिरांत आले. वलव्हणकर म्हणाले, "भक्तिमार्गाचें साधन जें नामस्मरण तें शद्बमय व नीरस असल्यामुळें त्यानें जीवाला संतुष्टता मिळत नाहीं. पण भगवंताचें रूप पाहतांच, बाळ आपल्या मातेला पाहतांच जसा तिच्या गळयाला मिठी मारून मातृप्रेमाचा आनंद लुटतो, अगदीं तसाच अनुभव भगवंताचें स्वरूप पाहिलें म्हणजे भक्ताला येतो व त्याची देहबुद्धि पार नाहींशी होते. म्हणून भगवंताचें रूप त्याच्या नामापेक्षां श्रेष्ठ आहे."

श्रीमहाराज म्हणाले, "अक्षर नाशवंत नाहीं म्हणूनच त्याला अक्षर म्हणतात. भगवंताचें नाम हें परमात्मशक्तीचें अक्षररूप प्रतीक जें ॐ तेंच आहे. मी म्हणतों तें सत्य कीं असत्य याचा अनुभव आपण प्रत्यक्ष नाम घ्यायला सुरवात करून पडताळून पहा आणि नामांत प्रेम निर्माण होतें कीं केवळ तो शद्बाचा पुनरुच्चार आहे हें अनुभवा."

हें एकून वलव्हणकरांचें पूर्ण समाधान झालें. 'नाम रूपापेक्षां श्रेष्ठ आहे हें मी पक्कें जाणलें' असें म्हणून त्यांनीं श्रीमहाराजांना नमस्कार घातला. महाराज बोलत असतां त्यांच्या मुखाचें तेज जणुं ओसंडत होतें व बुवांचे डोळे तर सारखे टिपकत होते. सभा स्तब्ध होती. अशा अवस्थेंत बुवांनीं त्यांना पुनः साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां त्यांना उचलून श्रीमहाराजांनीं त्यांच्या गळयांत तुळशीची माळ घातली व सर्व मंडळी प्रसाद घेऊन घरीं गेली.

श्रीमहाराजांनीं शास्त्र, पांडित्य व अध्यात्माच्या निष्ठावंत साधकास—मठपतीसही—नामाची साधना व तिचें महत्व पटवून नामसाधना अंगिकारण्यास लावलें हा त्यांच्या आयुष्यांतील शेवटचा पण महान् विजय होता.

———*———

# अनंतता

(गुरुदेव विनोद यांच्या अनंतते वरील अभंगांचे विवेचन)

निवेदक–श्री. चिपळूणकर गुरुजी

विशेषणांचे हे, वागवूनी ओझे
गीत दमले माझे, अनंतते
घालिता एकेक, तुझ्या अंगावरी
गळे ते सत्वरी, पुन्हा खाली
पुन्हा ते उचलोनी, वरी नेला कर
तूच निःशरीर, भासलीस

हे अनंतते, तू अद्‌भुत आहेस. तू भव्य आहेस, तू दिव्य आहेस. तुझा आकार उदात्त आहे. ही सारी विशेषणे तुझ्याकरिता शोधून माझे गीतही दमले. यांतील एकेक अलंकार तुझ्या अंगावर चढवायला गेलो तर जणु काही अधांतरी ठेवल्याप्रमाणे एक एक विशेषणालंकार गळून पडला. सर्व अलंकार पुन्हा गोळा केले आणि तुला सजविण्याकरिता हात वर केला तर तूच मला निःशरीर भासलीस. गुरुदेवाना ज्ञात असलेली व त्यांच्या जिज्ञासेत असलेली अनंतता ही फार वेगळी आहे. या जडजगाहून चिरतत्वात घेऊन जाणारी–मनष्याला जन्ममरणाच्या फेऱ्यातून सोडविणारी व केवळ परमेश्वरावर निखळ व निर्व्याज श्रद्धा ठेऊन त्याच्या सतत अनुसंधानाने व नामस्मरणाने प्राप्त होणारी–अशी अनंतता आहे. त्यांच्या अर्थी अनंतता म्हणजे निव्वळ आकाशाची पोकळी नव्हे. चंद्र, सूर्य, तारे वगैरे चमकताना दिसतात–ती ही अनंतता नव्हे. तर त्याहून वेगळी, जेथे मनोहर, चिरंतन परमेश्वर–सान्निध्याखेरीज काहीही नाही अशी अनंतता आहे. म्हणून त्या अनंततेला भव्य, दिव्य वगैरे उपकरणे, विशेषणे, अलंकार वगैरे काहीही नको आहेत. म्हणूनच त्याना ती अनंतता निःशरीर अशी भासली. तिचे अस्तित्व भावनेने जाणावयाचे आहे. स्पर्शाने अनुभवायचे नाही. भावना ही स्पर्शाने अनुभविण्याची चीजच नव्हे.

# ज्योतिषशास्त्र

लेखांक १० वा

## क्षीरस्फटिक ( Opal )

हे रत्न नेपच्यून ह्या गूढ ग्रहाचे असून ज्वालेप्रमाणे चमकदार दिसते. कारण यारत्नाचे पृथक्करण केले असता ९०% सिलिका व १०% पाणी अशा प्रमाणांत घटक मिळतात. हार्डनेस ६ असून स्पेसिफिक ग्रॅव्हिटी २.२१ असते.

नेपच्यून हा ग्रह सृष्टींतील गूढता, वाचासिद्धी, भविष्यवाणी, अंतर्मनातील खळबळ, नादलुब्धता, पारमार्थिक गोष्टी, चमत्कार इत्यादि गोष्टींवर अंमल गाजवतो. अर्थातच क्षीरस्फटिक हे रत्न ज्योतिषी, गूढ शास्त्राचा अभ्यास करणारे, प्लँचेट किंवा परलोक विद्या अशा विषयांचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तींचे भाग्य-रत्न ठरते. परगृह प्रवाशांना हे रत्न अत्यंत उत्तम अनुभव देते. या रत्नाच्या वापराने अंतर्मन प्रगल्भ बनून प्रकट मनावर अंमल गाजवूं लागते म्हणूनच अंतस्फूर्तीने भविष्यकथन करणाऱ्या व्यक्तींना किंवा भुतेखेते काढणाऱ्या व्यक्तींना हे रत्न नेहमी वापरावे लागते. वातावरणांतील अत्यंत गूढ संवेदना या सूक्ष्मपणे, हळुवारपणें जाणवूं लागतात म्हणून हे रत्न ६ वे ज्ञानेंद्रिय जागृत करणारे रत्न म्हणून वापर करण्यास हरकत नाही.

ज्या व्यक्तींना व्यवसायात अंतस्फूर्तीची ( Intuition ) मदत होते अशा व्यक्तींना–उदाहरणार्थ ज्योतिषी, डॉक्टर्स, भूमिविषयक सल्लागार यांना–हे रत्न फारच यशोदायी ठरते. एखादा ज्योतिषी जेव्हा एखादी भूमिपरीक्षा करण्यासाठी जातो तेव्हा ती भूमि तळतळाटाची आहे, तिच्यावर काही अतिमानवी शक्ति वावरताहेत, ती लाभेल की नाही ह्या प्रश्नांची तर्कापलिकडील, बुद्धीपलिकडील उत्तरे संवेदनक्षमतेने सूक्ष्मपणे अगर तरलपणे देता येण्यासाठी ओपलचा उपयोग होतो. वातावरणांतील लहरी जाणवणे हे ओपलमुळे शक्य होते. ज्या व्यक्तींना ही सहावी ज्ञानेंद्रियाची शक्ति उपजतच असते त्यांना अधिक प्रभावीपणे मागे घडलेल्या व पुढें घडणाऱ्या गोष्टी उमजूं लागतात व त्यालाच वातावरणांतील गूढ लहरी सूक्ष्म तरलपणें अनुभवणें असे आपण म्हणतो.

अनेक डॉक्टर्सनाही रुग्णाइताला तपासण्यापूर्वीच अमुक एक रोग असावा अशी संवेदना चमकून जाते व वारंवार तोच रोग असल्याचा पडताळा येतो. याचाच अर्थ त्या डॉक्टरने ओपल वापरल्यास बुद्धीपलीकडील जी एक अजब अंतःस्फूर्तीची शक्ति व्यक्तीत वसत असते तिचा उत्तम तऱ्हेने फायदा करून घेता येईल.

या रत्नाने मन एकाग्र होते, स्वतःचा आत्मा आतून गोष्टी सुचवू लागतो, समाधी अवस्थेंत व्यक्ति जाऊ शकते व दिव्य गोष्टींचा अनुभव येतो.

हे रत्न वेडसरपणा, विसराळूपणा, अकारण वाटणारी भीति, अंतर्मनातील गोंधळ, रुग्णाइताची बेभान अवस्था, व्यसनाधीनता इत्यादि विकारांवरही उत्तम अनुभव देते. कारण अंतर्मनाच्या खोल व गूढ गुंतागुंतीतूनच वरील विकार उद्‌भवतात आणि ओपल तर त्यावर अमृतवल्ली ठरते.

वेडसरपणा म्हणजेच अप्रकट मनाने प्रकट मनावर गाजवलेला विजय. परंतु प्रगट मनाला जशी ज्ञानेंद्रियांकडून कामे करून घेता येतात तशी शक्ति अप्रकट मनाला नसल्याने व्यक्ति काल्पनिक जगात वावरते व वेडाची सुरवात होते. ओपलचा वापर मानसिक रुग्णाइताची स्थिति हळूहळू ताळ्यावर आणतो. मनाचा आत्यंतिक हळवेपणा ज्या क्षेत्रांत लागतो अशी कलावंतांची क्षेत्रे की ज्यांत व्यक्ति संपूर्णपणे त्या भूमिकेशी तन्मय होऊन रंगून जावी लागते, एकरूप अभेद व्हावी लागते, अशा संवेदनक्षम नादलुब्ध कलावंत, जादुगार, मोहिनीविद्येचा प्रयोग करणारी मंडळी, जनसमुदायाच्या भावना हेलावणारे लेखक, वक्ते इत्यादींनी हे रत्न अवश्य वापरावे. परंतु त्याची शक्ति व वापर करण्याची कालमर्यादा शास्त्रीयदृष्टचा आधी ठरवावी.

—शरद दत्तात्रय उपाध्ये
(पत्ता : लहेर चेंबर्स, गोखले रोड नॉर्थ,
दादर, मुंबई २८.)

## २४ मार्च १९७२

—श्रीराम विष्णु सातर्डेकर.

१९४५ पासून आजपर्यंत आम्ही प्रतिवर्षी रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि दसरा या श्रीबाबांच्या तीनही उत्सवांस शिरडीस जात असतों. गेल्या (१९७२) च्या रामनवमीस मी माझ्या मुलांसमवेत गेलों असतां श्रीबाबांच्या कृपेनें एका मोठ्या संकटांतून निभावलों. त्याची हकिकत अशी—

मंगळवार दि. २१ मार्च १९७२ रोजीं माझीं ४ मुलें आणि मी शिर्डीस ता. २३ च्या रामनवमी उत्सवानिमित्त आलों. आम्ही उत्सव आटोपून रविवार ता. २६ रोजीं शिर्डीहून परत निघणार होतों. पण गुरुवार दि. २३ ला माझे मित्र श्री. सुभाष चित्रे यांच्याकडून समजलें कीं मुंबईसाठीं आपली परिचित भक्तमंडळी शुक्रवारची जादा

बस ठरवीत आहेत. त्याप्रमाणें यादी तयार केली, व संपूर्ण आकार आगाऊ देणारांसच सीट्स दिल्या जातील असें श्री. चित्रे यांनी सांगितलें. तेव्हां ताबडतोब त्या बसनेंच निघण्याचें ठरवून मी ६ सीटस्चे पैसे भरले. गुरुवारीं सुप्रसिद्ध गायिका मधुबाला चावला यांचे सासरे दिवंगत झाल्याची तार आल्यामुळें त्यांना शिर्डीचे आपले पुढचे कार्यक्रम रद्द करून अकस्मात् मुंबईस जावें लागलें, व संस्थानचे श्री. आपटे सहकुटुंब त्यांच्याबरोबर गेल्यामुळें त्यांच्यासाठीं रिझर्व केलेल्या शुक्रवार दुपारीं २.०० च्या गाडीच्या नेमक्या सहा सीट्स शिल्लक राहिल्या. ही म्हणजे नेहमीप्रमाणें सुटणारी एस्. टी. ची सर्व्हिस गाडी. तेव्हां मुंबई ऑफिसच्या एका कर्मचाऱ्यांनी त्या तिकिटां-विषयीं लोकांना विचारतां विचारतां मलाही विचारलें. परंतु मी जादा गाडीच्या (२॥ ला सुटणाऱ्या) त्याच दिवसाच्या ६ सीटस् आधींच घेतल्या असल्यामुळें त्यांना साभार नकार दिला.

शुक्रवार दि. २४ रोजीं मुंबईस जाणारी नेहमीची बस ठरल्या वेळीं २.०० वाजतां सुटली. आमची जादा बस २॥ वाजतां सुटली. नाशिक एस्. टी. स्थानकावर आमची बस सायंकाळीं ५॥ वाजतां गेली. त्यावेळीं दुपारीं २.०० वाजतां निघालेली बस तिथून सुटण्याच्या तयारींत होती. परंतु तिला कांहीं कारणांमुळें खोळंबा झाल व त्यामुळें आमची (जादा) बस नासिकहून अगोदर सुटून मार्गस्थ झाली. आमची स्पेशल बस असल्यामुळें आम्ही मुंबईला लौकर पोंचणार या आनंदांत होतों. तोंच, आमच्यानंतर १० मिनिटांनी सुटलेली ती सर्व्हिस बस नाशिकपासून ६ व्या मैलावर आमच्यापुढें जाण्याच्या प्रयत्नांत दिसली. ती बस आमच्या बरोबरीला येतांच तिकडच्या मंडळींनी आमच्या लोकांना वाकुल्या दाखविल्या. आमच्या लोकांनीही प्रतिसाद दिला. क्षणार्धांत मागची बस डौलानें पुढें गेली, तोंच वळणावर कानठळ्या बसविणारा आवाज झाला. पुढच्या बसला भयंकर स्वरूपाचा अपघात झाला होता ! आमच्या ड्रायव्हरनें जर प्रसंगावधान राखून आमची बस आवरली नसती तर ती पुढच्या बसवर आदळलीच असती.

आम्ही खालीं उतरलों. मी उदी व पाणी घेऊन धांवलों आणि रस्त्यावर फेकल्या गेलेल्या उतारूंना सहाय्य केलें. गाडीची एक बाजू मोकळी झाली होती. मध्यें झाड मिळल्यामुळें गाडी थांबली, नाहींतर १५–२० फूट खोल नाल्यांतच गाडी कोसळली असती व जास्तच अनर्थ घडला असता.

बसमधील जखमी उतारूंना आम्ही उतरून घेत होतों. जास्त सीरियस् असलेले चेंबूरचे रहिवासी श्री. चव्हाण यांचें कुटुंब आणि श्री. सुर्वे नांवाचे एक गृहस्थ (यांचा पाय तर साफ मोडला होता) यांना आम्ही बाहेर आणलें. या अवधींत एक तरुण साईचरणीं विलीन होण्याच्या मार्गावर होता. (या तरुणाचें नांव श्री. सतीश देसाई होतें व त्यानें रामनवमी उत्सवाच्या विविध कार्यक्रमांचीं दृश्यें आपल्या कॅमेऱ्यानें

टिपली होतीं ! ) या अपघाताचे प्रसंगीं नजीकच्या शेतांतील मंडळींनी व आमच्या बसमधील सर्वांनी सहाय्य केलें व येणाऱ्या बसेसमधून जखमींना सिव्हिल हॉस्पिटल, नासिक, येथें नेण्यांत आलें. मी माझ्या इतर साईभक्त मित्रांसमवेत मुलांना स्पेशल बसनें पुढें जाण्यास सांगितलें, व मी जखमी उतारूंना घेऊन हॉस्पिटलमध्यें आलों. त्या ठिकाणीं श्री. सतीश देसाई यांचें निधन झाल्याचें समजलें, व श्री. सुर्वे हे अत्यंत सीरियस् स्थितींत असल्याचें दिसलें.

अपघाताची बातमी दुसरे दिवशीं मुंबईंत पसरलीं. आम्ही शिर्डीस गेल्याचें परिचित मंडळीस माहीत होतें, व कदाचित् या अपघातांत आम्ही असूं अशा भावनेनें ८ दिवस ती मंडळी चौकशीला येत होती. त्यांस पुन्हा पुन्हा सविस्तर माहिती सांगण्यांत आम्हाला किती दुःख होत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

कधीं कधीं मनांत येतें कीं, अपघात झालेल्या गाडीचींच ६ तिकिटें आम्ही घेतलेलीं असतीं तर ! परंतु जादा गाडीचींच तिकिटें काढण्याची प्रेरणा बाबांनी दिल्यामुळें आम्हीं अपघातांतून वांचलों. पण अजूनही त्या प्रसंगाची आठवण झाली कीं अंगावर शहारे येतात. श्री बाबांची सेवा करण्याचें सदैव भाग्य लाभून त्यांची अशीच कृपादृष्टि लाभो हीच साईचरणीं प्रार्थना. आज दि. २४ मार्च १९७३ ला कै. सतीश देसाई आणि कै. सुर्वे यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त आम्हां सर्व साईभक्तांतर्फे मी साश्रु नयनांनी त्यांना श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

---

# दाम नको मज प्रेम हवे

दाम नको मज प्रेम हवे हेच मागणे तव चरणी
मला वाटते सेवेत रहावे अहर्निश अन् चिंतनी ....१
म्हणशील कधी मज तू माझा तोवरी मजला ही सजा
भोगण्यासी शक्ति दे अन् रंगु दे तव गोड भजनी
दाम नको मज प्रेम हवे हेच मागणे तव चरणी ....२
सत्कर्म घडो स्वाभिमान जडो लाचारी अन् अभिमान झडो
चिखलातिल पद्मापरि मज शुद्ध राहु दे सदा जीवनी
दाम नको मज प्रेम हवे हेच मागणे तव चरणी ....३
सत्संग मिळो नित वारी घडो मलिन शरिर हे तव चरणी पडो
शांती मिळो ही कांती उजळो
प्रेम हवे मज प्रेम हवे दाम नको मज प्रेम हवे ....४

—डी. बी. पोतनीस.

# रामगीतांजली

( रामायण व महाभारत या महाकाव्यांच्या कथानकांवर अनेक कवींनी पद्यरचना केली आहे. "इतिहासोत्तमादस्मात् जायंते कविबुद्धय:" असें महर्षि व्यासांचें वचनच आहे. याप्रमाणें सगळ्या देशी भाषांतून अजूनही या महाकाव्यांवर रचना होत आहेत. परंतु सहसा ज्या प्रसंगांवर रचना केलेली आढळत नाहीं असे प्रसंग निवडून त्यांवर श्री. दिवाकर अनंत घैसास यांनी नाविन्यपूर्ण पद्यरचना केली असून या रामनवमी विशेषांकापासून त्यांतील पद्यें आम्ही क्रमश: देत आहोंत. गायकांनाही हीं गीतें अत्यंत आवडतील अशी खात्री आहे.

—संपादक)

## पुष्प १

रामायण हें काव्य महान
पुरुषार्थाचा कीं सोपान ! ।। ध्रु० ।।
वाल्मीकीला स्फुरलें हृदयीं
अवीट अजुनी ती नवलाई
अंत:करणीं भरुनी राही
अमर–कथेचा हा अभिमान ! ।। १ ।।
उपोद्धात हे आदर्शांचे
नीतिधर्म हे आर्यजनांचे
कोमलतेशीं कर्तव्यांचें
जुळलें अभिनव हें संधान ! ।। २ ।।
त्यागबुद्धिची मर्यादांची
दृढ व्रतांची सहिष्णुतेची
परंपरा ही पराक्रमांची
सहकार्याचा हा सन्मान ।। ३ ।।
गीत सजविलें संगीतानें
सादर केलें तें विनयानें
श्रवण करावें भावभक्तिनें
ऋजुतेनें द्यावें अवधान ।। ४ ।।
अथांग महिमा रामप्रभूंचा
प्राकृत माझी दुर्बळ वाचा
कसा आकळूं नील नभाचा
अंत–पार मी विहंग सान ।। ५ ।।

—दिवाकर अ. घैसास

# निरोप कैसा सांगू वहिनी

शब्द अडखळे माझा, वदनीं !
निरोप कैसा सांगू वहिनी ? ॥ ध्रु० ॥

आनंदानें हृदयीं फुलुनी
वस्त्रभूषणें सर्वे घेउनी
उत्सुकतेनें रथात बसुनी
सुखांत येसी इथें वनीं ॥ १ ॥

वनगमनाची इच्छा अपुली
रघुरायांनी असे पुरविली
भ्रमांत ऐशा वृत्ती खुलली
कळवळतों मी परी मनीं ॥ २ ॥

अपकीर्तीनें भिउनी गेले
दादा चित्तीं अती क्षोभले
काम मला हें दुष्कर दिधलें
राजाज्ञेची शपथ घालुनी ॥ ३ ॥

दगड ठेवुनी हृदयावरती
ऐक शब्द, जे राम सांगती
'सोडुन द्यावें तुला वनांतीं
परित्यक्त राही तू विजनीं" ॥ ४ ॥

कुचंबणा ही असह्य होते
मला न असलें कर्म करवतें
यापेक्षां खड्गाचें पातें
बरें फिरविलें मानेवरुनी ॥ ५ ॥

स्मरतों पूर्वी पंचवटींत
जातों सोडुनि पर्णकुटींत
हाय केवढा झाला घात !
अशुभ कोणतें आतां फिरुनी ? ॥ ६ ॥

क्षमा करी ! तुज वंदन करितों
दास सदांचा अभय मागतो
गंगातीरीं निरोप घेतों
प्रदक्षिणा तुज जातों करुनी ॥ ७ ॥

—दिवाकर अ. घैसास.

विश्वशांतीची जननी बाबांची दिव्य वाणी

# वाटचाल पुढती

नको करूं तूं खंत कशाचिहि मी तव सांगाती ।
श्रद्धा ठेवुनि, सबुरि धरोनि वाट चाल पुढती ॥ ध्रु० ॥
पैसा डोले पैसा बोले त्यासी नाही ताल ।
होई जग मग नैतिक कंगाल मानव बेताल ॥ १ ॥
इथुनि तिथुनि बघ सर्व ठिकाणी पैशासी मान ।
दृष्टिस पडतां वरि प्रेमाने वांकवि बिबि मान ॥ २ ॥
परमार्थाचे प्राप्तिकारणे पैसा हें पथ्य ।
कटाक्षानें त्यासि टाळितां सांपडेल सत्य ॥ ३ ॥
गुलाब मिळविणे समज मानवा कष्टचि फार अती ।
हातीं पडण्यापूर्वी बघ ते ओरखडे हाती ॥ ४ ॥
परमार्थाची हीच वाट बघ बाभुळ बनिची वाट ।
जातां तुडवित तुडवित जातां रक्ताचे पाट ॥ ५ ॥
सातत्याने चालु राहुंदे तपरुपि तव सेवा ।
घडि भरतां प्रभु घेउनि येइल महा दिव्य मेवा ॥ ६ ॥
निष्काम तप तव वाढत जाइल नित्य वस्तु वरती ।
"पत" मग नविकच वाढेल त्याचे पतपेढीवरती ॥ ७ ॥
श्रद्धा ठेवुनि माझेवरती वाट चाल पुढती ।
एक दिनी मग मुक्तचि होशिल हीच फलप्राप्ती ॥ ८ ॥
कशासि बससी मांडि घालुनी, हातीं जपमाळ ।
सत्संगचि दे, देवा मजला हा जप ही माळ ॥ ९ ॥
जग हे सारे भवरूपि सागर वादळेंच उठती ।
कोंडि फोडण्या शकेल का तव जीवन नौका ती ॥ १० ॥
सत्संगाचें वल्हे करुनियां बाबा नावाडी ।
हां हां म्हणता नेइल बघ तव नौका पैल थडी ॥ ११ ॥

साई दरबार तर्फे

कवि – "हमाल" बाबांचे चरणीं.

* * *

# शिरडीवृत्त - फेब्रुवारी १९७३

या महिन्यांत भक्तांची गर्दी थोडी कमी प्रमाणांत होती.

कांही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणें :—

कीर्तन :– (१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तनें नेहमी प्रमाणें झाली.

(२) ह. भ. प. जेउरकर महाराज, अहमदनगर. (३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी. (४) ह. भ. प. सोपानकाका वालमे, अहमदनगर.

प्रवचने :– (१) ह. भ. प. डॉ. अनिलबुवा मराठे ऊर्फ सेवादास, जि.–जळगांव.

(२) ह. भ. प. बाप्पाजी रत्नपारखी, शिर्डी.

भजन, गायन :– (१) श्री. वसंत शा. पुराणिक, धुळे. (२) ह. भ. प. श्री. सद्‌गुरु दत्त भजन मंडळ, मुंबई. (३) सौ. सीता लक्ष्मी ऊर्फ साईमीरा, पुणे. (४) श्री. एन. पी. वडीरवाये, दुर्ग. (५) श्री. श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई. (६) श्री. विठ्ठल ग. कीर्तिकर, मुंबई. (७) कु. नीला बा. शेलार, ठाणे. (८) श्री. आर. एल. नरसीमन्, जि.–दुर्ग. (९) श्री. सुधीर वि. देवरुखकर, जि.–ठाणे. (१०) श्रीमती आनंदा वागळे, मुंबई.

## माननीयांच्या भेटी :–

१) मा. श्री. जे. आर. मुधोळकर, माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली.
२) मा. श्री. मा. वि. देव, आय एएस; कमिशनर मुंबई विभाग, मुंबई.
३) स्वामी बशीरबाबा, आंध्रप्रदेश.
४) मा. श्री. विनोद नाईक, आय, ए एस, राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे वैयक्तिक चिटणीस.
५) मा. श्री. त्र्यं. शि. भारदे, माजी सभापती, महाराष्ट्र विधानसभा.
६) मा. श्री. के. टी. राठोड साहेब, मंत्री, म्हैसूर स्टेट.
७) मा श्री. पी. बी. जगदाळे, जनरल मॅनेजर, पी एम टी, पुणे.
८) मा. श्री. पी. सुब्रह्मण्यम्, आय ए एस, जिल्हाधिकारी, अहमदनगर.

हवापाणी :– शिर्डी यथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांही नाही.

देणग्या :– (जानेवारी यादींतून उरलेल्या) शिरडी ४०८८.८९, मुंबई १४३०.००. फेब्रुआरी :– कोठी रु. ७९६०.०३. अन्नदान रु. ५१५१.३४. कायम फंड रु. ११९७.२५. रुग्णालय रु. २०१५. ११. अभिषेक रु. १०१. शिक्षण व इमारत रु. २००. नांवगांव इ. तपशील इंग्रजींत पहावा.

# श्री साईबाबा शिरडी संस्थानचीं प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| १. श्री साई सच्चरित (मराठी) | रु. | ११-०० |
| २. श्री साई सच्चरित (इंग्रजी) | रु. | ७-०० |
| ३. श्री साई सच्चरित (गुजराती) | रु. | ६-५० |
| ४. श्री साई सच्चरित (हिंदी) | रु. | ६-०० |
| ५. श्री साई सच्चरित (कानडी) | रु. | ६-०० |
| ६. श्री साई बाबा जीवितचरित्रम् (तेलगु) | रु. | १०-०० |
| ७. श्री साईनाथ स्तवनमंजरी व सुमनांजली | रु. | ०-२० |
| ८. दासगणूकृत ४ अध्याय | रु. | ०-५० |
| ९. सगुणोपासना (मराठी किंवा गुजराती) | रु. | ०-२५ |
| १०. श्री. प्रधान कृत चरित्र (इंग्रजी) | रु. | १-५० |
| ११. श्री साई लीलामृत | रु. | ३-२५ |
| १२. सचित्र साईबाबा | रु. | १-५० |
| १३. शीलधी | रु. | ०-७५ |
| १४. साईबाबा : अवतार व कार्य (अ. य. धोंड) | रु. | २-५० |
| १५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा आल्बम) | रु. | ३-०० |
| १६. श्री साईलीला मासिक (मराठी किंवा इंग्रजी) | | |
| वार्षिक वर्गणी – प्रत्येकी | रु. | ६-०० |
| किरकोळ अंकास – | रु. | ०-६० |

आगामी प्रकाशन

## मुलांचे साईबाबा

(द. दि. परचुरे)

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी., डॉ. आंबेडकर रोड, दादर,–१४.

Regd. No. MH 527


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किमत | आकार | किमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी) | किमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२५ |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| १. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा आल्बम) | | | ३-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४.



मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,
४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई-१५

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४